INTERNATIONAL INSTITUTE OF ISLAMIC THOUGHT

# इज्तिहाद आणि नवीकरण

# IJTIHAD *and* RENEWAL

*Said Shabbar*

IIIT Books-In-Brief Series

# इज्तिहाद आणि नवीकरण

✻ लेखक ✻

सईद शब्बर

इंग्रजी भाषांतर : नॅन्सी रॉबर्टस्
इंग्रजी संक्षिप्तरूप : वॅण्डा क्राऊस

Institute of Objective Studies

© IIIT, 1444 AH / 2023 CE
IIIT, P.O. Box 669, Herndon, VA 20172, USA ● www.iiit.org
P.O. Box 126, Richmond, Surrey TW9 2UD, UK ● www.iiituk.com

*This book is in copyright. Subject to statutory exception and to the provisions of relevant collective licensing agreements, no reproduction of any part may take place without the written permission of the publishers.*

**ISBN : 978-93-91659-23-3**

*The views and opinions expressed in this book are those of the author and not necessarily those of the publisher. The publisher is not responsible for the accuracy of URLs for external or third-party internet websites, if cited, and does not guarantee that any content on such websites is, or will remain, accurate or appropriate.*

**Ijtihad Ani Navikaran**
(Marathi)
**Said Shabbar**

**Translator: Hayatmahammad Pathan**
**Translation of IJTIHAD and RENEWAL**
IIIT Books-in-Brief Series

Original title in English was published in 2018 by IIIT

First published in Marathi, 2023
Published in India by: Institute of Objective Studies
162, Jogabai Main Road, Jamia Nagar, New Delhi 110025
email: ios.newdelhi@gmail.com | www.iosworld.org

Distributed by
Genuine Publications and Media Pvt. Ltd.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi 110013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
email: info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

Printed at:Bosco Society for Printing and Graphic Training, New Delhi

Price: ₹ 50.00

## IIIT संक्षिप्त पुस्तक मालिका

IIIT संक्षिप्त पुस्तक मालिका संस्थेचा बहुमोल प्रकाशन संग्रह आहे. वाचकांना मूळ लेखनाचा गाभा कळण्यासाठी संक्षेपात दिलेला हा सार आहे. याची निर्मिती आटोपशीर स्वरूपाची आहे. तसेच वाचनास सोपी व वेळेची बचत करणारी आहे. बारकाईने लिहिलेला हा सारांश मोठ्या ग्रंथाचा जवळून घेतलेला धांडोळा आहे. हा प्रयत्न वाचकांना मुख्य लेखन वाचण्यासाठी प्रेरित करेल, अशी आशा आहे.

मुस्लिम जगतात सकारात्मक पुनरुज्जीवन किंवा सुधारणा घडवून आणण्यात इज्तिहाद मूलभूत भूमिका पार पाडू शकतो. याचे परिश्रमपूर्वक विश्लेषण सईद शब्बर यांनी 'इज्तिहाद ॲण्ड रिन्यूअल' ग्रंथात केले आहे. इस्लामच्या सुरुवातीच्या शतकात कुरआन आणि हदीसचा आधार घेत विद्वानांनी अन्वयार्थ लावताना त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आणि बुद्धिमत्तेचा वापर केला. नंतरची शतके या विद्वानांच्या विद्यमान निवाड्यांचेच पालन करत सामान्यतः इज्तिहादची दारेबंद असलेल्या अवस्थेत गेली. बुद्धिजीवी, सुधारणावादी, धार्मिक विद्वान, उदारवादी, समाजशास्त्रज्ञ, अगदी निधर्मवाद्यांसह इतर काहींनी त्यांच्या त्यांच्या लोलकातून पाहात ऱ्हासाची ही प्रक्रिया उलथवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश आले नाही. मुस्लिम समुदाय ज्या स्थितीत स्वतःला पाहतो आहे, त्या स्थितीत मतभिन्नता, मतभेद व विरोधाभासाला थारा देऊ शकत नाही. मुस्लिम अभिसंस्कृती व संस्कृती उत्कर्षाच्या परम बिंदूवर असताना या गोष्टींना स्थान होते आणि त्यांना ती सामावून घेऊ शकली. कारण त्यावेळी ती स्वायत्त , सर्वसमावेशी आणि मजबूत होती. मात्र, सद्यःस्थितीत त्यात थोड्या अंशाचा फरकही व्यापक व दूरगामी परिणाम घडवू शकतो, त्यामुळे तिला आता हे सोसवणारे नाही. अवघड पेचांवर व्यापक सहमती ही आजच्या काळाची हाक आहे. या पेचांना सामोरे जाताना निश्चित दिशेने पावले पडली पाहिजेत आणि उद्देश अतिशय स्पष्ट पाहिजे.

इस्लामी धर्मशास्त्राच्या विविध शाखा प्रसृत करणाऱ्या ज्या विद्वानांच्या साहित्याच्या नकला पुढे होत गेल्या, त्याच विद्वानांनी तकलीदला (अनुकरण) ठामपणे विरोध केला आणि ते निषिद्ध ठरवले. त्यांनी

अभ्यासाच्या महत्त्वावर, इज्तिहादवर आणि याला आधार देणारे पुरावे गोळा करण्यावर विशेष भर दिला आहे. हा सर्व विरोधाभास शब्बर यांनी दाखवून दिला आहे. त्यांनी इज्तिहाद करणाऱ्या व्यक्तीसाठी म्हणजेच मुज्तहीदसाठी पात्रतेच्या पूर्वअटी स्पष्ट केल्या आहेत. ते म्हणतात, बौद्धिक नवीकरण म्हणजे विद्यमान विचारापासून दूर जाणे किंवा नवी विचारसरणी जन्माला घालणे नाही. या उलट विद्यमान संकल्पनांचा पुनर्शोध आणि त्यांचा आपल्या काळाशी सुसंगत विकास करणे आहे. अर्थात हा विकास अनुरूप नियम, रीत वापरत व मान्यताप्राप्त स्थिर मानक लक्षात घेत करणे अपेक्षित आहे. शब्बर सांगतात की वास्तव जीवनातील परिस्थितीत इस्लामी कायदा-पायंडे वापरण्याचा अनुरूप दृष्टीकोन हा वास्तववाद, नियमन, व धर्माच्या मजबूत चौकटीनुसार विचार व कृतीसाठी हाक देतो. हे सर्वच घटक महत्त्वपूर्ण आहेत, कारण त्यांच्यापैकी कोणताही एक घटक इस्लामी कायद्यापायंडाचा वापर निश्चित करू शकत नाही. ते सर्व घटक आले आणि एकत्र काम करू लागले की आपण समकालीन इस्लामी विचारसाखळीचे दुवे पुन्हा जोडू लागू.

संक्षिप्तीकरण : **वॅण्डा क्राऊस**

**सईद शब्बर** यांच्या

**Ijtihad and Renewal**

या मूळ ग्रंथाच्या संक्षिप्त इंग्रजी आवृत्तीवरून

ISBN hbk: 978-1-56564-976-7

ISBN pbk: 978-1-56564-975-0

2017

## भाग एक : समकालीन इस्लामी विचारविश्वात नवीकरण आणि इज्तिहाद चळवळ – केंद्रीय संज्ञा आणि संकल्पना

प्रकरण पहिले

# इज्तिहादचा अर्थ आणि मत (अल राय) संकल्पनेशी त्याचा संबंध

### इज्तिहाद – उत्पत्ती, त्याचा इस्लामी कायद्याच्या अनुषंगाने अर्थ, तांत्रिक संज्ञा म्हणून वापर

ज–ह–द या अक्षराचा मूळधातू याचा उच्चार एकतर जहादा किंवा जहुदा म्हणून केला जातो. हा शब्द प्रयत्न वाढवण्याची क्रिया दर्शवितो. लिसान अल–अरब सारखे बहुतांश शब्दकोश जहादा आणि जहुदा यांच्यात फरक करतात. जहादा फक्त खर्ची घातलेले प्रयत्न दर्शवतो. तर जहुदा समान प्रक्रियेचा अर्थ दर्शवत, पण सोबत कठोर परिश्रम आणि अडचणी यांचा समावेश करतो. ज–ह–द या मूळधातूतच व्युत्पन्न होणारे जिहाद व मुजाहदादः या शब्द वाचा व कृतीच्या अत्यंत परिश्रम आणि प्रयत्नांची प्रक्रिया दर्शवितात. मजहूद आणि तजाहूद हेही इज्तिहाद सारखीच प्रक्रिया दर्शवतात. त्याचा अर्थ जाणीवपूर्वक करत असलेले किंवा केलेले परिश्रम असा होतो.ज–ह–द या मूळ धातूतून उत्पन्न अनेक शब्द कुरआनात आढळतात. जसे जहद (जाहदाक, तुजाहीदून, जाहीदूम) आणि जिहाद. यात सत्य संदेशाच्या निमंत्रणाविरुद्ध सशस्त्र विरोधातील सशस्त्र संघर्ष आणि संपत्तीचा खर्च इथवर अर्थाचा विस्तार आहे.

इज्तिहाद हा शब्द कुरआनमध्ये कोठेही आढळत नाही. तथापि, या शब्दाद्वारे व्यक्त केलेला अर्थ कुरआनमध्ये असंख्य ठिकाणी आढळतो. या बाबतीत हदीस साहित्य इज्तिहादाच्या विशिष्ट कायदेशीर पैलूंकडे लक्ष देते. प्रारंभीच्या परिस्थितीत संदेशाच्या प्रकटीकरणाविषयी बोलताना, उदाहरणार्थ, आयशा (रजि.) यांनी अशी आठवण सांगितली आहे; पैगंबर (त्यांना शांती लाभो) म्हणाले होते की, तो जिब्राईल मला घेऊन गेला आणि माझी सर्व ऊर्जा खर्च होईपर्यंत मला कवटाळे.

इस्लामिक न्यायशास्त्राच्या विचारप्रणालींच्या स्थापनेसह आणि

इस्लामिक न्यायवादी सिद्धांत (उसूलु लफिक़ः) स्पष्टपणे परिभाषित केले गेल्यानंतर इज्तिहादचे नियमन आणि मानकीकरण निश्चित केले गेले.

या वेळच्या बहुतेक विद्वानांच्या 'उसूलु अल फिक़हः' च्या व्याख्यांमध्ये अंतर शोधता येईल. तो प्रामुख्याने मुज्तहिदची (इज्तिहादमध्ये व्यस्त असलेली व्यक्ती) अट, उपस्थित केलेले प्रश्न, आणि (किंवा) कायद्याच्या पायंड्याचे प्रकार, जसे कायदेशीर, अंदाजे, व्यावहारिक, तर्कसंगत किंवा इतर.

इब्ने हज्म यांनी अल् अहकाम या ग्रंथात इज्तिहादची व्याख्या दिली आहे. ते म्हणतात, इस्लामिक कायद्याच्या संदर्भात इज्तिहाद हा शब्द सर्व संबंधित पुराव्यांचा आधार घेत पायंडा घालणाऱ्या निर्णयावर येण्याचा प्रयत्न दर्शवतो. तर, इमाम अल गझाली ( हिजरी ५०५, इ.स.११११ ) यांनी म्हटले आहे की, विद्वान इज्तिहाद शब्द खास करून इस्लामी कायद्यावर आधारीत पायंडे समजून घेण्यासाठी स्वत:ला शिक्षित करण्याच्या प्रयत्नास वापरतात. खरे तर कायद्याच्या निर्णय पायंड्यांमधून येणारी नेमकी अट ही मुज्तहिदच्या अवघड कार्याचा भाग आहे. त्यातून अनेक वर्षांच्या काळात इज्तिहादची पारिभाषिक व्याख्या विकसित झाली. तसेच इज्तिहादला इतर कायद्यांच्या स्वरूपापासून वेगळे स्वतंत्र अस्तित्त्व दिले.

परिणामी, इज्तिहाद हा शब्द दोन निकषांनुसार मोजला जातो. १) ते अंदाजात्मक किंवा निश्चित बाबींशी निगडीत आहे का, २) ते बरोबर किंवा चुकीचे आहे का. दुसरा निकष धार्मिक ज्ञानाच्या सर्व प्रश्नांत प्रथम येतो आणि तो केवळ न्यायिक बाबींसंबंधातच नाही, तर, धर्मशास्त्र, इस्लामिक कायदेशीर तत्त्वे व न्यायविषयक मुद्दे या प्रत्येक क्षेत्रांच्या बाबतीत तपासणीची विशिष्ट पद्धत, स्वीकार आणि पुराव्याचा वापरायचा संबंध आहे.

काळाच्या ओघात इतर अभिसंस्कृतींच्या बौद्धिक आणि तर्कसंगत विकासासोबत गती राखण्यात मुस्लिम समाजाला आलेले अपयश ही मोठी अडचण आहे. त्यामुळे इस्लामी न्यायशास्त्रात साचलेपण आले आणि ते मागच्या काळात ओढले गेले, इज्तिहाद ही गतकाळाची गोष्ट समजली गेली. त्याचा मुस्लिम अभिसंस्कृतीत कारणमीमांसेला मोठा हादरा बसला. जागतिक व्यवस्थेतील तिची अग्रणी भूमिका हळूहळू तिला सोडून द्यावी लागली. हे

गतवैभव पुन्हा मिळविण्यासाठी मुस्लिम समाजाला इज्तिहादच्या व्यापक प्रथा पुन्हा चालू करणे आवश्यक आहे. अर्थात जीवनाचे प्रत्येक विशिष्ट क्षेत्र, राजकारण, अर्थशास्त्र, इस्लामिक न्यायशास्त्र, हदीस विज्ञान, भाषाशास्त्र आणि त्याच्या उपशास्त्रीय किंवा इतर सर्व कारणमीमांसेच्या विशिष्ट पद्धतीशी संबंधित आहेत, हे लक्षात घेऊन.

**इज्तिहाद आणि विविध मते (अल राय)**

इब्ने अब्दुल बार (हि ४६३/इस १०७१) यांनी त्यांच्या जामी बयान अल इल्म व फज्लिही या पुस्तकात अनेक पारंपरिक उल्लेख व हदीस यांचा हवाला दिला आहे. इज्तिहाद अल रायसंबंधी या गोष्टी पैगंबरांच्या सहकाऱ्यांकडून पुढच्या पिढीला हस्तांतरीत होत आल्या आहेत. इब्ने अल कय्यिम (हि ७५१/ इस १३५०) यांनी त्यांच्या इलाम अल मुवक्कीन पुस्तकात इज्तिहादविषयी मतांची तीन वर्गात विभागणी केली आहे. १) उघडपणे बाद असलेली २) योग्य आणि ३) संशयास्पद. मुस्लिम विद्वानांची मते दोन धारणात गाळता येतील. एक कौतुकास पात्र, ही मते कुरआनातील मार्गदर्शनारूप आहेत, सुन्ना परंपरेला धरून आहेत आणि मुस्लिम विद्वान समुदाय सहमत आहे. दुसरे, दोषपात्रं इमाम अल शाफी इज्तिहाद आणि कियास (अदमास) यांना एकच मानले आहे. त्यामुळे या संज्ञा त्यांनी एकमेकांना पर्यायी म्हणून वापरल्या आहेत. इज्तिहाद आणि न्यायिक हवाले (इस्तिहसान) यांच्यातील समजुतीचा गोंधळ टाळण्यासाठी अल शाफी यांनी हा प्रयत्न केलेला दिसतो.

मुस्तफा अब्दुल रज्जाक यांच्या मते, आधुनिक इस्लामी विद्वान इज्तिहाद अल् रायकडे आरंभीच्या काळातील मुस्लिम विद्वानांमध्ये विकसित होत असलेल्या तार्किक दृष्टिकोनातून आकारास आलेले कायद्याचे पायंडे म्हणून पाहतात. कुरआनाच्या आधारे विकसित झालेल्या आणि आकारास आलेल्या तार्किक दृष्टिकोनाने इस्लामी कायदे प्रणालींचा उदय घडवला. तिला उसूलु अल फिक़ह किंवा न्यायिक तत्त्वे म्हणून ओळखले जाते. अलीकडचे संशोधक फथी अल दुरयानी (१९२३–२०१३) यांच्या मते अल राय किंवा इज्तिहाद अल रायहे निव्वळ अमूर्त विचारांतून आलेले नाही. अर्थात अमूर्त विचार हा काही इस्लामी कायद्याचा आधार नाही. इज्तिहाद

अल रायची चर्चा करताना विद्वान मजकुराचा किंवा शब्दांचा केवळ भाषिक तर्क किंवा त्यातील लक्षणार्थच घेतात असे नाही. त्याऐवजी ते मजकूर आणि विद्वानांच्या बौद्धिक आकलन क्षमता यांच्यातील संबंधाचे नियमन मान्यता प्राप्त नियम आणि तत्त्वानुसार होते कोणाही हे ही पाहतात, जेणे करून त्यांना तार्किक त्रुटीचा किंवा भावूक होण्याचा, वैयक्तिक लालसेचा किंवा पूर्वग्रहाचा धोका होऊ नये.

इज्तिहाद ही तफसीर (टीका-विश्लेषण), तावील (अन्वयार्थ) आणि इतर काही संज्ञांच्या विरुद्ध वापरण्यात आलेली संज्ञा आहे. अदीब अल सालिह (जन्म १९२६) यांनी तफसीरची व्याख्या केली आहे. ते म्हणातात, 'तफसीर म्हणजे शब्दांच्या अर्थाचे आणि त्याच्या धार्मिक कोनाचे, पायंड्याचे स्पष्टीकरण जेणे करून संबंधित मजकूराचा वापर स्पष्ट आकलनाच्या आधारे मजबुतीने करता येईल.' या व्याख्येच्या आधारे तफसीरच्या प्रक्रियेतील इज्तिहादचा उद्देश हा पुढे आलेला मजकूर आणि त्याच्यासह न्यायिक अंमल व वापर स्पष्ट करणे आहे. ज्या इज्तिहादविषयी आपण बोलत आहोत, तो पहिल्या वर्गातील आहे. त्याला कौतुकपात्र (दखलपात्र) म्हटले जाते. ते इस्लामी कायद्याशी प्रामाणिक असते, कारण ते पैगंबर परंपरा (सुन्ना) आणि कुरआनवर आधारीत असते. इथे राय ही संज्ञा इज्तिहादसाठी आणि इज्तिहाद रायसाठी पर्यायी शब्द म्हणून वापरत आहे.

प्रकरण दुसरे

## इज्तिहादच्या पद्धतिशास्त्राचा समावेश

इज्तिहादचा वापर अधिकारवाणी असलेल्या साधानांच्या आधारे केला पाहिजे. इज्तिहादचे एखादे वक्तव्य ईश्वराच्या पैगंबरांचे कथनावर आधारित असेल तर ते स्वयं अधिकृत ठरते. कारण त्याला कुरआनचा आधार असणार आहे. म्हणजेच पैगंबरांवर कुरआन अवतरले आहे आणि त्यांनी अवतरलेला तो संदेश जशाच्या तशा स्वरूपात लोकांपर्यंत यशस्वीपणे पोचवला आहे. अल शौकानी (मृत्यू हि. १२५०/इस १८३४) यांच्यानुसार पैगंबरांच्या सहकाऱ्यांकडून इज्तिहादच्या स्वरूपातून आकारास आलेली मते इस्लामी कायद्यासाठी आधार ठरू शकतात. पण, अट एकच की ती मते पैगंबरांकडून शिक्कामोर्तब झालेली असावीत. अबु हनिफा (मृत्यू हि. १५० /इस ७६७) यांचे धोरण पुढील प्रमाणे होते; पहिल्यांदा ईश्वराने पाठवलेल्या पुस्तकातील जे काही सर्व सांगितले आहे, ते स्वीकारणे. जर तिथून एखाद्या प्रश्नाचे उत्तर मिळत नसेल तर ते पैगंबर कथनपरंपरेत (सुन्ना) शोधणे, आणि त्यानंतर पैगंबरांच्या सहकाऱ्यांनी नोंदवलेल्या मतांमध्ये शोध घेणे.

इमामअल हरमायन अल जुवायनी (मृत्यू हि. ४७८ / इस १०८५) यांचे मत वेगळे आहे. सामन्य माणसांनी पैगंबरांच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या मतांना चिकटून राहण्याची गरज नाही. त्याऐवजी त्यांनी नंतरच्या काळातील विद्वानांच्या निष्कर्षांचा आधार घेतला पाहिजे. कारण या विद्वानांनी अथक परिश्रम करून पैगंबरांच्या सहकाऱ्यांनी विशिष्ट प्रश्नांबाबत मांडलेल्या मतांची पार्श्वभूमी आणि तत्कालीन परिस्थिती याचा शोध घेतलेला असतो. कोणत्या परिस्थितीत अभिप्राय दिला गेला यालाही महत्त्वाचे असते. अल जबरींच्या मते, आजच्या काळानुरूप इस्लामी कायद्याच्या वापरासाठी अधिकारवाणी असलेले स्रोत निश्चित करणे गरजेचे आहे, जो आपल्या इस्लामी कायदा पायंड्यांच्या वापराचे नियमन करेल. त्यांच्या मते केवळ पैगंबरांच्या सहकाऱ्यांचे अभिप्रायच एका विशिष्ट बिंदूभोवती सर्व मुस्लिमांना एकत्र आणू शकतात. कारण या सहकाऱ्यांच्या नंतरच्या काळात धर्मशास्त्राच्या अनेक शाखा विकसित झाल्या आहेत आणि विविध मुद्दे आणि प्रश्नांवरील त्यांच्यातील भेद मोठ्या प्रमाणात समोर आलेले आहेत.

**इज्तिहाद आणि स्पष्ट संदर्भ**

इज्तिहादची व्याप्ती अपुरी माहिती असलेल्या विषयांपुरती आहे. ती निश्चित स्वरूपाच्या माहितीसाठी नाही. त्यामुळे स्पष्ट संदर्भांच्या बाबतीत इज्तिहाद नाही (ला इज्तिहाद माअ अल नास), हे ब्रीद असले पाहिजे. म्हणजेच जिथे संदर्भ खरे आणि अर्थाच्या बाबतीत निश्चित व स्पष्ट आहेत, तिथे इज्तिहाद नाही. हे सूत्र आजही सशक्त आहे. किंबहुना हा चर्चेचा विषय झालेला आहे. कारण त्याचा वापर कुरआन आणि सुन्नाबाबत कल्पक भर टाकणे किंवा कल्पक अन्वयार्थ लावण्यापासून परावृत्त करण्यासाठी केले जाते. विशेषतः स्पष्ट परिस्थितीत कुरआन व सुन्नाच्या वापरासंदर्भात. मग प्रश्न असा आहे, जर संदर्भ निश्चित असल्याचे मानले गेले तर, त्याच्या बाबतीत कोणत्याही मुद्द्यावर आपल्याला इज्तिहाद करता येणार नाही का?

निश्चित संदर्भांच्या दुय्यम किंवा पुरक विषयांबाबत विचार करताना इज्तिहाद त्या संदर्भांबाबत आधीचा निर्णय कायमस्वरूपी फिरवत नाही. तर तो इज्तिहाद आधीच्या निर्णयाच्या पुढे जाऊ शकणारा असू शकतो. आधीच्या काळाप्रमाणे आधुनिक काळातही इज्तिहादची हद्द दोन क्षेत्रापुरती मानली जाते. १) कुरआन आणि सुन्नामध्ये स्पष्टपणे उल्लेख नसलेले विषय, आणि २) अर्थाबाबत किंवा सत्य असण्याबाबत संदर्भ हे अपुऱ्या माहितीवर आधारित आहेत, असे विषय. यात आपण तिसऱ्याची भर घालू शकतो. ज्याला इज्तिहादचे आग्रही समर्थक आणि इस्लामी कायद्याविषयी प्रश्न उपस्थित करणारे विद्वान फथी अल दुरयानी यांनी 'शब्दशः लागू होणारे' असे संबोधले आहे.

समकालीन इज्तिहाद वाचताना, अब्दुल अल माजीद अल नज्जर (जन्म १९४५) यांनी सुचवले आहे की, संदर्भ अधिकाधिक निश्चित असल्यास तो समजून घेण्यास कारणमीमांसेची भूमिका तितकी कमी होत जाते. तसेच तो उलट प्रकारही आहे. संदर्भ जितके अनिश्चित, अस्पष्ट असतील तेवढी कारणमीमांसेची भूमिका वाढत जाते. यापुढे जाऊन युसूफ अल करदावी (जन्म १९२६) यांनी मत व्यक्त केले आहे. ते सुचवतात की, इज्तिहाद करणे म्हणजे १) हाती असलेला विषय पूर्णपणे स्पष्ट होण्यासाठी हर

तऱ्हेने प्रयत्न करणे, २) स्पष्ट व निश्चित असलेले विषय इज्तिहादचे विषय नाहीत, ३) स्पष्ट वाटत असले तरी अनिश्चित व अस्पष्ट संदर्भ आणि पायंडे हे निश्चित स्वरूपाचे असल्याचे समजून चालणार नाही, ४) इज्तिहादचा उद्देश न्यायिक लेखन आणि पारंपरिक विचारप्रणालींमधील विद्यमान दरी दूर करणारा दुवा निर्माण करण्यासाठी केले पाहिजे, ५) नव्या फायदेशीर दृष्टीचे स्वागत केले पाहिजे, ६) सामूहिक इज्तिहादकडे वळण्याची गरज आहे, कारण एकट्या व्यक्तीपेक्षा पूर्ण समूहाचे मत जास्त बरोबर असू शकते.

**इज्तिहाद आणि न्यायविषयक तत्त्वे**

इस्लामी कायदा लक्षणीयरित्या व्यापक व लवचिक आहे. परिणामी तो कारणमीमांसेसाठी पुरेशी जागा देतो. अन्वयार्थ लावण्यासाठी पुरेशी मोकळीक देतो. जेणे करून वेगवेगळ्या परिस्थितीत योग्य निष्कर्षावर येता येईल. जिच्याविषयी स्पष्ट संदर्भ नाहीत अशा विशिष्ठ स्थितीत निष्कर्ष काढण्यासाठी काही पद्धती वापरण्यास परवानगी आहे. जसे विश्लेषात्मक मीमांसा (कियास), न्यायिक प्राधान्य (इस्तिहसान), मर्यादित हितसंबंधाच्या पलिकडे जात कारणमीमांसा करणे (इस्तिसलाह) आणि इतर. इस्लामी कायद्याचा लक्ष्य व हेतू पुरेसा सर्वसमावेशक आहे. त्यामुळे हा हेतू मुस्लिम न्यायाधिशांना त्याच्या विचार प्रक्रियेत भौतिक आणि आध्यात्मिक या दोन्ही हितसंबंधांची नोंद घेण्यासाठी मुभा देतो. तसेच ते मजबूत पायाचा आधार असलेल्या विशेष न्यायिक पायंड्यांचे विश्लेषण आणि मोजदाद करण्याची मुभा देतो. अट एकच, हे पायंडे ताअब्बुदिय्याह (आदेश किंवा मानवी मीमांसेने स्पष्टीकरण देता येत नाहीत, आणि ज्याला ज्ञात आधार वा प्रसंग नाही, असे ) वर्गवारीतील नसावेत.

अल शौकानी यांनी त्यांच्या इर्शाद अल फुहूल ग्रंथात इज्मा शब्दाची व्याख्या केली आहे. साधारणपणे या शब्दाचा अर्थ सहमती म्हणून सांगितला जातो. त्यांनी पैगंबरांच्या मृत्यूनंतर मुस्लिम समाजातील मुज्तहीद मंडळी मधील कोणत्याही काळातील आणि कोणत्याही विषयाबाबतीत सहमती, अशी व्याख्या केली आहे. ही इज्माची व्याख्या उसूलच्या विद्वानांनी सामान्यतः स्वीकारलेली आहे. यातून हेही स्पष्ट होते की, जर १) ही सहमती इज्तिहादसाठी पात्र नसलेल्या विद्वानांची नसेल, २) मुस्लिमांशिवाय अन्य

समुदायांना लागू केली जात नसेल, ३) या व्याख्येत पैगंबरांच्या हयातीत कोणत्याही विषयावर असलेल्या एकमताचा समावेश केला नसेल, तर ती व्याख्या स्वीकारण्याजोगी आहे.

ज्ञानाशी किंवा सार्थक कृतीशी संबंध नसलेल्या असंख्य मार्गांनी सहमतीची संकल्पना व्यक्त करण्यात आली आहे. अशा मार्गातून आलेल्या संकल्पना उसूलच्या विद्वानांसाठी प्रदीर्घ चर्चेचा विषय ठरला आहे. सहमतीला मनाई करणाऱ्या विद्वानांनी तिच्या विरोधात असंख्य मुद्दे उपस्थित केले आहेत. दुसरीकडे अनेक विद्वानांनी हे आक्षेप नाकारत सहमतीच्या संकल्पनेची सार्थकता मांडली आहे. सहमतीवर विसंबून राहण्याविषयी अडचणी उपस्थित केलेल्यांनी मुस्लिमांच्या ऐतिहासिक अनुभवांचा दाखला दिला आहे. उदाहरणार्थ आपल्या लक्षात येईल की, आरंभीच्या विद्वानांनी सांगितलेली सहमती मुस्लिम समुदायाने पैगंबरांच्या सहकाऱ्यांच्या युगाशिवाय नंतर अनुभवलेली नाही.

म्हणून, उसूलचे विद्वान अल शौकानी हे त्यांचे पुस्तक इर्शाद अल फुहूलमध्ये सांगतात, सहमतीवर विश्वास ठेवणाऱ्या सर्व मातब्बरांची मांडणी स्वीकारली तर या सर्व मांडणींतून आपण जास्तीत जास्त असा निष्कर्ष काढू शकतो की, हे लोक ज्यावर सहमत झाले आहेत ती बाब वैध आहे. पण, ती केवळ वैध आहे म्हणून ती कवटाळलीच पाहिजे असे नाही. अहमद शाकीर (१८९२-१९५८) म्हणतात, उसूलचे तज्ज्ञ ज्या सहमतीच्या प्रकाराविषयी बोलतात, ते सामान्यतः वास्तव नसते. तो एक भ्रम असतो. असे अनेक कायदेपंडित आहेत, जे त्यांच्या दाव्याला अनुकूल पुरेसे पुरावे देण्यात अपयशी ठरल्यानंतर त्यांच्या बाजूने मुद्द्यावर सहमती असल्याचा दावा करत विरोधकांवर अश्रद्ध असल्याचा शिक्का मारतात. अल्लाल अल फसी (१९१०-१९७४) यांनी त्यांच्या मकासिद अल शरियाह अल इस्लामियाह व मकारिमुहा (इस्लामी कायद्याचा हेतू व मूल्ये) पुस्तकात म्हटले आहे, मुज्तहिदांकडून येणारी सहमती ही शक्य एकमेव वैध सहमती आहे. सहमती वास्तवात येण्यात अपयशी ठरण्यास किमान दोन कारणे आहेत,१) सहमती साध्य करण्यासाठी अपुरी प्रेरणा, २) जगभरातील मुस्लिमांना एक करू शकणाऱ्या खिलाफतीचा ऱ्हास.

पैगंबरांचे सहकारी त्यांच्या काळात त्यांच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करून घेण्यासाठी सर्व श्रद्धावानांना एकत्र करून त्यांच्याशी सल्लामसलत करत असत. अशी कृती आज करण्यासाठी आवाहन करणे हे सयुक्तीक ठरेल असे मला वाटत नाही. कारण उघड आहे, त्या मुस्लिम समाजाचा काळ आणि आजच्या मुस्लिम समाजाचा काळ या दोहोत मूलभूत फरक आहे. आजचा मुस्लिम समाज फूट टाकणाऱ्या आतील  आणि बाहेरी कारकांचा दबाव झेलत आहे. इतकेच नव्हे तर, हेही लक्षात ठेवले पाहिजे की आरंभीचे खलिफा हे त्यांच्या काळातील अग्रणी मुज्तहिद होते. त्यांना लौकिक व्यवस्था आणि कुरआनातील पारलौकिक शिकवण यांचा समन्वय करण्याची दूरदृष्टी लाभलेली होती. तसेच ते त्यांच्या नंतर येणाऱ्या लोकांपेक्षा सरसही होते.

इज्मामध्ये सर्वांत पहिल्यांदा मुस्लिम समाजातील पात्र मुज्तहिदांमधील सहमतीचा समावेश होतो. ही सहमती इतर सर्व मुस्लिम सदस्यांना कळवली गेली पाहिजे. हे करताना कुरआनातील सुरह अल तौबा (९:१२२) मधील आदेश लक्षात ठेवला पाहिजे. हा आदेश म्हणतो, मुस्लिमांना आम्ही युद्ध काळात रणांगणावर नसताना श्रद्धेचा अभ्यास करण्यासाठी सांगितले आहे. जेणे करून ते युद्धावरून घरी परतणाऱ्या त्यांच्या बांधवांना श्रद्धेच्या गोष्टी शिकवू शकतील. अशा पद्धतीने विद्वानांमधील सहमती ही सामान्य मुस्लिमांत पोचते आणि संपूर्ण इस्लामी समुदायाची सहमती बनते. अशा व्यापक सहमतींची जागा स्थानिक मर्यादा असलेल्या असंख्य सहमतींना घ्यायला लावण्याचे समर्थन करता येणार नाही. या संकुचित सहमती त्यांच्या स्थानिक पातळीवर योग्य असतात. तसेच जिथे सहमतीच साध्य होऊ शकणार नाही अशा टोकापर्यंत संकल्पनेचा विस्तार फुगवण्याचेही समर्थन करता येणार नाही.

सामूहिक इज्तिहाद हा श्रद्धेला कवटाळण्याच्या आदेशाला मुस्लिम समाजाने दिलेला प्रतिसाद आहे. तसेच तो मुस्लिम समुदायाच्या बौद्धिक, सांस्कृतिक, राजकीय आणि समाजिक ऐक्य, बळ आणि एकात्मतेची अभिव्यक्ती करणारा आहे. एकत्र येत सामूहिक इज्तिहाद करण्याच्या गरजेबाबत मुस्लिमांमध्ये सार्वत्रिक तत्त्वतः सहमती आहे. अर्थात याला कसे स्वरूप द्यायचे, हे साध्य करण्यासाठी कोणती पद्धत वापरली पाहिजे, तसेच

सामूहिक इज्तिहाद आणि ते अंमलात आणणारी व्यवस्था (सरकारी यंत्रणा) यांच्यातील संबंध कसे असावेत याविषयी मतभेद जरूर आहेत.

काही विचारवंतांनी सर्व इस्लामी विज्ञान क्षेत्रांचा अभ्यास असलेल्यांची अकादमी स्थापन करण्यास सुचवले आहे. हे अभ्यासक इस्लामी विश्वातील सर्व भौगोलिक भागातून येत आणि सर्व धर्मशास्त्र प्रणालींचे नेतृत्व करत व्यापक पटल बनवणारे असतील. ते मुस्लिमांच्या गरजांवर चर्चा करतील, मुस्लिमांना सर्वत्र लागू होईल असा कायदापायंडा देण्यावर सहमत होतील आणि त्यांचे निर्णय प्रकाशित-प्रचारित करतील. दुसरी एक सूचना आहे. सर्व मुस्लिम राज्यांनी लायक विद्वानांना त्यांचे कायदे मंडळ बनवण्यासाठी मान्यता आणि अधिकार द्यावा. यात सर्व मुस्लिम जगातील प्रतिनिधी असावेत आणि या कायदे मंडळाचा निर्णय सर्व मुस्लिम राज्यांवर बंधनकारक असला पाहिजे.

अल तुराबी यांच्या मते इज्माचा विचार हा न्याय करण्याच्या आधुनिक पद्धतीप्रमाणे आकार घेऊ शकतो. त्या पद्धतीने विद्वानांकडून न्याय-न्यायिक पायंडे घेता येतील. तसेच प्रातिनिधीक संसदीय व्यवस्थेतून अप्रत्यक्ष सहमती घेता येईल. वेगळ्या शब्दांत सागांयचे तर संसदीय मंडळावर विद्वानांना जगातील मुस्लिम मुक्तपणे निवडून देतील, या मंडळावर अधिकृत सहमती गाठण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी असेल. म्हणजेच जर इज्माकडे संपूर्ण जगातील मुस्लिम समाजाची सहमती म्हणून पाहिले जात असेल तर तिचा उद्देश मुस्लिमांचे बौद्धिक व राजकीय ऐक्य जपणे असेल. सहमतीतून आलेल्या निर्णयाची जमिनीवरील अंमलबजावणी करायची तर या सहमतीची प्रक्रिया विस्तृत हवी, जेणे करून तीत (अधिकृत निर्णय घेणाऱ्या) सरकारी यंत्रणांना सामावून घेता आले पाहिजे.

इज्मा किंवा सहमती या संज्ञेच्या बाबतीत आपण इज्तिहाद हा शब्द इस्लामी न्यायव्यवस्थेतील त्याच्या पारंपरिक संबंधापेक्षा अधिक व्यापक आणि अधिक समावेशी अंगाने वापरत आहोत. इज्तिहादच्या अशा प्रकाराविषयी आपण बोलत आहोत, ज्यात व्यापक सहभाग, सेवेसाठी सबंध मुस्लिम समुदायाकडे असलेल्या सर्व स्रोत-साधनांचा आणि सुप्तशक्ती यांचा वापर करता येईल.

प्रकरण तिसरे

# इज्तिहादच्या अटी आणि सहमती–असहमतीचे द्वंद

इज्तिहादशी संबंधित वादग्रस्त मुद्दा म्हणजे मुज्तहिदने पात्रतेची अट पूर्ण केली पाहिजे. त्याने इज्तिहाद करण्याआधी वैयक्तिकरित्या सिद्ध झाले पाहिजे. पात्रतेच्या आवश्यक अटींच्या प्रकाराबाबत उसूलच्या तज्ज्ञांत मतभिन्नता आढळते. तसेच त्याने कोणत्या नियम–शर्ती व किती सहानुभूती अंगीकारावी या विषयीही मतभिन्नता आढळते. हा वाद पार आधुनिक काळातपर्यंत चालत आलेला आहे; विशेषतः जीवनाच्या विविध क्षेत्रात प्रगती करण्यात मुस्लिम समुदायाला आलेल्या अपयशामुळे.

**समकालीन विचार आणि जतन विरुद्ध फेरविचार वाद**

मुज्तहिदसाठी आवश्यक अटींच्या समकालीन वादात सर्व साधारणपणे दोन कल दिसतात. पहिला म्हणजे अटींचा फेरविचार करणे आणि पारंपारिक स्वरूपाच्या मर्यादांमुळे त्यांचे आजच्या घडीला पालन करण्यात अडचण येत असल्यास त्या कमी करणे. दुसरा म्हणजे या अटींचे त्यांच्या मूळ स्वरूपात जतन करणे, विशेषतः आजच्या काळात शिक्षण व संशोधनातील झेपेमुळे विस्तारलेल्या संधी न्यायक्षेत्रात लक्षात घेत. पहिल्यांदा अटी–शर्तींची स्पष्ट मांडणी करणारा मनुष्य म्हणून अल शाफिई यांचे नाव घेता येईल. फेरविचार करण्याच्या दाव्यासाठी विद्यमान अटी कुरआन किंवा सुन्नाहवर स्पष्टपणे आधारित नसल्याचा युक्तिवाद केला जातो. पण, या अटी एका प्राथमिक निष्कर्षावर आधारीत आहेत. तो म्हणजे, इज्तिहाद हा पूर्ण जाण बाळगत दैवी संदेशाची अंमलबजावणी करण्याचे कार्य पार पाडतोय अशी खात्री या अटी देतात. तरीही त्या कुरआन किंवा सुन्नाहचा भाग नसल्याने असहमती होऊ शकते. असे सांगितले जातेय की मुज्तहिदवर अटींच्या नेमकेपणाचा अवाजवी भार टाकल्याने त्याच्यात इज्तिहादची प्रेरणा मेली आणि नक्कल करण्याची प्रवृत्ती वाढली.

अल तुराबींच्या मते, इज्तिहादचे नियमन करणारे नियम हे केवळ धर्माच्या अन्वयार्थाच्या जबाबदारीतून सूट असलेले सामान्य लोक आणि धर्माच्या गूढतेचा, दडलेल्या सत्याचा अन्वायार्थ लावण्याचा एकाधिकार असलेले धर्म पंडित अशी समाजाची विभागणी करून या दोहोंमध्ये

औपचारिक सीमारेषा म्हणून काम करतात, असे नव्हे. तर निश्चित औपचारिक पात्रता ही एखादी व्यक्ती मुज्तहिदच्या कामासाठी तयार आहे की नाही, पाहणे. उदा. एखाद्या व्यक्तीने विशिष्ट क्षेत्रात विद्यापीठीय पदवी मिळवली वा नाही हे पाहणे. अर्थात ज्या काही पात्रतेच्या अटी असतील, त्या असतील, पण, हे लक्षात घेतले पाहिजे की शेवटी यातून केला जाणारा न्याय-निवाडा हा सामान्य मुस्लिमजनांच्या अंमलासाठी असणार आहे.

दुसरी एक अट इस्माईल अल फारुकी यांनी घातली आहे. ती म्हणजे, इस्लामीपण. या अटीची भर घालण्यासाठी समर्थन करताना स्पष्ट केले आहे की, इस्लामीपण ही पूर्व अट उसूलच्या विद्वानांनी उल्लेख केलेल्या सर्व अटींच्या वर आहे. दुसरी गोष्ट, मुज्तहिद देणारे कायदे-पायंडे हे उच्च ध्येय किंवा उद्देश असलेले आणि इस्लामी तत्त्वज्ञान व मूल्यांनी आकार दिलेले असतील.

**इज्तिहादसाठी पात्रतेच्या अटी: ऐतिहासिक आणि समकालीन साचे**

अल जुवायनी यांनी त्यांच्या अल बुरहान पुस्तकात इतर अनेक उसूलच्या विद्वानांनी मुज्तहिदच्या अंगी आवश्यक मानलेले गुण सांगितले आहेत. अल इसफरायीनी (३१७-४१८ हिजरी, ९४९-१०२७ इ.स.) यांनी अशा चाळीस गुणांची यादी दिली आहे. मुज्तहिद उदा. १) प्रौढावस्था प्राप्त केलेला असावा. २) अरबी भाषेची उत्तम जाण हवी, ३) कुरआन आणि कुरआनिक विज्ञानाचा, इस्लामी कायद्याच्या प्रमुख साधनां, इतिहासा, हदीस शास्त्राची आणि न्यायशास्त्राची माहिती हवी, ४) मानवी मानसशास्त्राची परिपूर्ण समज हवी. इमाम अल गझाली यांनी अल मुस्तफा पुस्तकात म्हटले आहे की, पहिल्यांदा त्याने (मुज्तहिदने) इस्लामी कायद्याचे उच्च उद्देश समजून घेतले पाहिजेत, आणि अनुरूप प्रश्न विचारण्याची मत व्यक्त करण्याची, कुशल योग्यता मिळवली पाहिजे, मुद्द्यांची औचित्य व महत्तेनुसार क्रमवारी लावण्याचे कसब मिळवले पाहिजे. दुसरी गोष्ट, मुज्तहिदने चारित्र्य संपन्न असायला हवे. पापांपासून दूर राहायला हवे, जेणे करून न्याय-निवाडा करताना त्याच्या पात्रतेचा संकोच होणार नाही.

अल झरकशी यांनी सांगितलेल्या अनेक पैकी महत्त्वाची अट म्हणून संज्ञा वापरली, ती म्हणजे नजर (कैफियात अल नजर). म्हणजेच पुराव्यांचा, व्याख्यांचा वापर कसा करावा, आणि वैध परिघ कसा करावा

याची जाण हवी. याला उद्देशून अल झरकशी यांनी लिहिले आहे, मुज्तहिदला तर्कशास्त्राची समज हवी. हे अल गझाली यांच्या अटींवर आधारीत आहे. इब्न तयमियाह (मृ. ७२८ हि./ १३२८ इ.स.) यांनी मजमू अल फतावा पुस्तकात म्हटले आहे, जो कुणी इज्तिहाद करण्यासाठी तर्कशास्त्राची जाण ही अट असल्याचा दावा करतो, त्याअर्थी त्याचा दावा इस्लामी कायदा आणि (ग्रीक) तर्कशास्त्राचे नेमके स्वरूप याविषयी अज्ञान प्रकट करतो. अल झरकशी यांनी अल बहर अल मुहीतमध्ये मुज्तहिदसाठी पात्रता सांगितली आहे. त्या यादीत ते म्हणतात, तयार नजर व बुद्धिमत्ता, धर्माच्या साधनांवर आधारित व्यापक ज्ञान, आणि अंकगणिताचे ज्ञान. अल शातिबी यांनी मुज्तहिदसाठी आवश्यक पात्रता दोन अटींत स्पष्ट केली आहे. १) इस्लामी कायद्याच्या उद्देशाचे व भूमिकेचे सर्वंकष ज्ञान, आणि २) यावरील तर्कानुसार न्याय-पायंडा देण्याची क्षमता. अल राजी यांनी अल महसूल फी इल्म अल उसूल ग्रंथात म्हटले आहे, विद्वानांमधील सहमती ठरवताना, विशिष्ट क्षेत्रातील मतांचा विचार करताना त्या क्षेत्रातील तज्ज्ञ असलेल्या मुज्तहिदांच्या मतांचा विचार केला पाहिजे, जरी ते अन्य क्षेत्रात पारंगत नसले तरी.

अल करदावी यांनी स्पष्ट केले आहे की, मुज्तहिदला आठ विषयांचे ज्ञान पाहिजे. ते आठ विषय असे; कुरआन, सुन्नाह, अरबी भाषा, सहमतीचे बिंदू, न्यायशास्त्राची तत्त्वे, इस्लामी कायद्याची भूमिका व हेतू, लोक आणि जीवनाचार. अल्लाल अल फसी यांच्या मते, मुज्तहिद तीन मूलभूत साधनांवर उभा राहतो; १) दैवी पुराव्यांचे ज्ञान, २) अरबी शब्दांच्या अर्थछटांचा नेमका बोध, ३) पुराव्यांचे वजन तपासण्याच्या आणि योग्य बाजूने जास्त अनुरूप निवडण्याच्या प्रक्रियेची माहिती.अल फिक्र अल सामी या पुस्तकात अल हजवा अल थालिबी (मृ. १९५६) यांनी मुज्तहिद म्हणजे बुद्धिमान प्रौढ असल्याचे सांगितले आहे. अनेकविध विद्याशाखा समजून घेण्याची त्याच्याकडे हातोटी असते, तो तर्कसंगत पुराव्याचे मोल समजतो, आणि ज्याच्याकडे अरबी भाषाशास्त्र, धार्मिक मूलाधार, वाणी-लेखन, आणि कुरआन व सुन्नाहवर आधारीत उचित पुराव्यांची माहिती या सर्वांवर त्याचे प्रभूत्व असते.

**इज्तिहादचा विचार : बरोबर आणि चूक**

इज्तिहादच्या विचारांत बरोबर की चूक हा प्रश्न एखाद्या व्यक्तीच्या मुज्तहिद होण्याच्या पात्रतेच्या अटींच्या अतिशय जवळचा आहे. या अटी लावण्याचा उद्देश ज्ञान मिळवण्यास उत्सूक व्यक्तीची मुज्तहिदची भूमिका पार पाडण्यासाठी तयारी झाली असल्याची खात्री करणे आहे. इस्लामी कायदा सांगतो की, मुज्तहिदचा कायदा–पायंडा बरोबर असेल तर तो दोन बक्षिसे मिळवतो आणि चूक असेल तर एक बक्षीस मिळवतो. अर्थात, अपात्र व्यक्तींना इज्तिहादच्या कार्यात गुंतण्यास मनाई करण्यात आली आहे. अशा मंडळींचे कायदा–पायंडे जरी बरोबर असले तरी, ते निवाड्यात चुकले असून अयोग्य काम करत आहेत, असे म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, हे दोन्ही दोष त्यांच्याकडे येतात.

जीवनाच्या अनेक क्षेत्रात इज्तिहादची परंपरा खंडीत झाल्यामुळे मुस्लिम समुदायाला आधारहीन शोध, चुकीच्या दिशेने नेणाऱ्या संकल्पना यांची लागण आणि निष्क्रियता, मागासलेपणा व साचलेपणा याची बाधा झाली आहे. ही वस्तुस्थिती आहे. या उलट इज्तिहाद ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. यात त्रुटी व आधारहीन मते यांना स्थान राहात नाही. कारण मुज्तहिद वेळोवेळी दुरुस्ती करत त्यागोष्टी उपटून टाकण्याचे काम करत असतात.

उसुलूचे तज्ज्ञ सत्य एक सामाईक असल्याच्या परिघापासून सुरुवात करतात. शेवट करताना ते म्हणतात की, सर्व मुज्तहिद, त्यांच्यात मतभिन्नता असूनही, प्राथमिक स्तरावर बरोबर आहेत. अर्थात यापैकी कोणाच्या कायदा–पायंड्यात परिपूर्ण सत्याचे आकलन झाले आहे हे निश्चितपणे सांगणे शक्य होत नाही, तोपर्यंत. तर सत्य वेगवेगळ्या परिस्थितीनुसार व प्रकरणानुसार वेगवेगळे स्वरूप धारण करत असते, अशी सुरुवात करणारे विद्वानही मतभिन्नता असूनही सर्व मुज्तहिद बरोबर असल्याचा शेवट करतात.

बरोबर आणि चूकच्या चर्चेत अनेक विद्वान तर्कसंगत भाष्य (अक्ललियात) आणि कायदेशीर भाष्य (शरियात) असा फरक करत दोन परिघ मानतात. तर्कसंगत भाष्यातील त्रुटी एखाद्यास ईश्वर आणि पैगंबर यांचे आकलन होण्यासाठी रोखू शकते. कारण, या दुसऱ्या परिघात सत्य एक आहे, दुसरा नाही.जे हे सत्य मानतात ते श्रद्धेच्या मार्गावर आहेत, आणि जे मानत नाहीत ते अश्रद्ध आहेत. जे या दोन्हींच्यामध्ये आहेत, त्यांच्याविषयी मत वेगळे आहे.

**भाग दोन : इज्तिहादच्या संबंधात नवीकरण (तज्‌दीद), नकल (तकलीद) आणि इमान (इत्तीबाअ)**

प्रकरण चौथे

## तज्‌दीद आणि इज्तिहादमधील विरोधी व पुरक मुद्दे

### तज्‌दीद – उत्पत्ती, शाब्दिक अर्थ, कायद्यातील अर्थ व तांत्रिक संज्ञा म्हणून वापर

तजदीद शब्द तीन मुळाक्षरे त–ज–द पासून बनलेला असून त्यापासून अनेक रूप बनलेले आहेत. उदा. क्रियापद जद्दा (नाम– जिद्दाह) चा अर्थ नविन होणे किंवा बनणे आणि ते क्रियापद इज्तहादाच्या अर्थाशी साधर्म्य दर्शवते. ते प्रयत्नांची पराकाष्टा सांगत नवा अर्थ प्रकट करतो.जद्दा क्रियापदाचा मूळ अर्थ तुटणे, अलग होणे आहे (नाम– जद्द). विशेषनाम जदूद हे मादी उंटासाठी वापरले जाते तेव्हा त्याचा अर्थ तिने दूध देणे थांबवले आहे, असा होतो. थ्वाब जदीद म्हणजे नवा झगा, जो नव्याने कापला आहे. तर संबंधित क्रियापदांचे स्वरूप असे – तजद्दादा (नूतनीकरण झालेले),जद्दादा (नूतनीकरण करणे), इस्तजद्दा (नवीन उदयास येणे). शब्दिक नाम जिद्दाहचा अर्थ बिला शब्दाविरुद्ध आहे. बिलाचा अर्थ ऱ्हास किंवा झीज आहे. म्हणून सूर्य व चंद्रासाठी एक संज्ञा वापली जाते, अल जदिदान (दोन नवे), कारण त्यांचा ऱ्हास होत नाही किंवा ते झिजून नष्ट होत नाहीत.

कुरआनात जदीद हे विशेषण सहा वेळा आल्याचे आपल्याला आढळते. या उलट सुन्नाहमध्ये तज्‌दीद आणि इज्तिहाद हे दिशादर्शन, मार्गदर्शन अर्थाने वापरले आहेत, ते कायमस्वरूपी नसले तरी इतर सर्व अर्थ आणि संदर्भ बाजूला सारणारे आहे. सुन्नाहमध्ये ज–द–द मुळाक्षरांपासून बनलेले शब्द वापरले आहेत. ते कापणे किंवा तुकडे करणे, खंड करणे, स्वयंपूर्ण, थोरवी, मजबूत बांधा, स्पष्टता, आणि नाविन्य या आशयाने येणारे आणि झीजच्या विरोधी अर्थाचे आढळतात. काही विद्वान नवीकरण ही चळवळ एक किंवा अनेक व्यक्तींनी सुरू केली आहे, असे मानतात. इतर विद्वान ही चळवळ संपूर्ण समाजाने सुरू केल्याचे मानतात.

मात्र, ही व्यक्ती किंवा हा सगळा समूह इस्लामी न्यायशास्त्रात पारंगत असणे गरजेचे नाही. अल तुराबींच्या नजरेत, धार्मिक पुनर्नविनीकरणाची प्रक्रिया समूहाने एकत्रितरित्या सुरू करणे गरजेचे आहे. कारण, सध्याच्या काळात आपले जीवन अतिशय गुंतागुंतीचे झाले आहे. त्यामुळे एकट्यासाठी नविनीकरणाची प्रक्रिया सुरू करणे खूप खूप अवघड बाब आहे. तो कितीही लौकिक असलेला आणि प्रभावी असला तरीही तो एक हाती करू शकेल अशी आवाक्यातील ही गोष्ट नाही. अलकरदावी धार्मिक नूतनीकरणाच्या व्याख्येची व्याप्ती वाढवण्याचा प्रस्ताव ठेवतात. यासाठी त्यांनी पैगंबरांच्या हदीसचा संदर्भ घेतला आहे. या हदीस सांगतात, धार्मिक नूतनीकरणाला प्रोत्साहन देणे हे एकट्याचे काम नाही. ते सत्यशोधन उद्देश असलेल्या, एकत्रित काम करणाऱ्या लोकसमूहाचे काम आहे. नुतनीकरण करणे म्हणजे विद्यमान गोष्टीचे स्वरूप पूर्ण बदलून त्याच्या जागी नवीन गोष्ट आणणे नाही. तर, त्या अर्थविद्यमान गोष्टीला तिची मूळस्थिती किंवा स्वरूप परत मिळवून देणे आहे. धार्मिक नूतनीकरणाबाबतीत सांगायचे झाले तर, या प्रक्रियेत मूळ पायावर बांधाबांधी करणे आणि धर्माच्या मूळ संदेश आणि उद्देशाकडे परतणे आहे.

इस्लाममध्ये बौद्धिक नूतनीकरण विद्यमान विचारांपासून दूर जात नाही. किंवा त्या जागी नव्या विचाराची व्यवस्था आणून ठेवत नाही. या उलट ते आजघडीच्या गरजा लक्षात घेत आधीच विद्यमान असलेल्या संकल्पनांचा फेरशोध घेत विकास करते. अर्थात अनुरूप नियमांच्या, पद्धतिशास्त्रांच्या आणि मान्यताप्राप्त सातत्याच्या आधारे शोध घेते. त्यासाठी अधिकारीवाणी असलेली संदर्भ साधने म्हणजे कुरआन, पैगंबरांची सुन्नाह, इस्लामी तत्त्वे समजून घेण्यासाठी लागणारी साधने व कार्यपद्धती (जशी कारणमीमांसा, सहमती आदी) आणि इस्लामी बौद्धिक व न्याय परंपरेचा वारसा.

**आधुनिक इस्लामी बौद्धिक नूतनीकरणाचे नमुने**

नूतनीकरणाचा आरंभ बिंदू कुरआन आणि सुन्नाहमध्ये दडलेला आहे. कुरआन आणि सुन्नाहविषयी आपली समज आणि त्याचा अंमल हा पहिल्या पिढीतील मुस्लिमांचे अनुभवरंग आणि मार्गदर्शन यातून निर्माण झालेला आहे. विशेषतः पैगंबरांचे सहकारी, तसेच त्यानंतरच्या पिढीच्या

अनुभवावर आधारीत आहे. एखाद्या मुद्द्यावर समज आणि प्रतिसाद यावर विद्वान आणि विचारवंत यांच्यात मतभिन्नता असू शकते. तरीही यात मूळ परिघ आणि अंतिम उद्देश हे एकच आहेत तोवर काहीही नुकसान नाही. धार्मिक व बौद्धिक नूतनीकरणाच्या अनेक समकालीन नमुन्यांपैकी प्रत्येक नमुना तीन मूळ गोष्टीत विभागला जाऊ शकतो. धर्म, कारणमीमांसा व वास्तव (म्हणजेच मजबूत परिस्थिती), किंवा वेगळ्या शब्दांत संदेश अवतरणे, माणुसकी व परलोक या तीन गोष्टी. विशेष म्हणजे त्या एकमेकांना छेद देणाऱ्याही आहेत. याची जाणीव या नूतनीकरणाच्या प्रक्रियेत असते.

कुठलीही समाजरचना केवळ कला, विज्ञान व बुद्धिमत्ता याच्या जोरावर टिकू शकत नाही. माणसाला प्रगती आणि विकासाच्या दिशेने नेण्याचे काम त्याची आध्यात्मिक बाजू करत असते. जिथे आध्यात्मिक बाजू गायब आहे, तिथे अभिसंस्कृतीचा ऱ्हास होतो. ज्याच्याकडे वर जाण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव आहे, त्याला गुरुत्वाकर्षण शक्तीचा प्रभाव खाली नेण्याशिवाय इतर कुठेही नेत नाही.

अभिसांस्कृतिक नूतनीकरण आणि नवजागरण यासाठी मलिक बेनाबी (१९०५-१९७३) यांनी अटी सांगितल्या आहेत. त्यांच्या मते माणूस, माती आणि काळ. हे तीन घटक सामाजिक भांडवलाची निर्मिती करतात. त्यांनी आरंभीच्या ऐतिहासिक टप्प्यावर मुस्लिम समुदायाला सामाजिक भांडवल पुरवले. आजच्या काळात ज्याला महत्त्व दिले पाहिजे अशा मुद्द्यांची यादीच मुनीर शफीक (जन्म १९३४) यांनी दिली आहे. त्याच्या मते, मुस्लिम समुदायने स्वतःला परकीय नियंत्रणातून मुक्त करत स्वायत्तता आणि आत्मसन्मान मिळवला पाहिजे, जगभर मुस्लिम समुदायातील कप्पेबंद विभागणी आणि त्याचे परिणाम दूर सारून ऐक्य साधले पाहिजे, विकासाचे मुद्दे, सामाजिक न्यायाचा प्रश्न, माणसाचा आब राखणे, सल्लामसलतीची पद्धत रुजवणे आणि लोक व त्यांच्या राज्यकर्त्यांमध्ये नाते, पर्यावरणाचे प्रदूषण, गरीब देशांतील मजुरांवरील कर्जाचे ओझे, कुटुंबव्यवस्थेची मोडकळ. या मुद्यांकडे प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे.

### नूतनीकरण आणि त्याची समज व वापराविषयी विविध दृष्टीकोन

विद्वान तज्दीद आणि त्याच्याशी संबंधीत इतर संज्ञांत फरक करतात (तज्दीदचे सामान्यतः नूतनीकरण असे भाषांतर केले जाते). असा फरक करण्यामागील कारण म्हणजे, यातील काही संज्ञांचा आजच्या काळातील अर्थच्छटा आणि वापरास हा ऐतिहासिक काळातील मुस्लिम समुदायाच्या श्रद्धा व रीत यांना छेद देतो. अशा स्थितीत या संज्ञांचा वापर पूर्णपणे बाद ठरवण्याऐवजी त्यांचा अवांछनिय अर्थाशी व वापराशी संबंध विच्छेद केला पाहिजे. यासाठी या संज्ञांची उत्पत्ती, भाषाशास्त्र व वैध उगम यांचा आधार घेतला पाहिजे. सर्वात जास्त नूतनीकरण म्हणजे ज्यात पुनरुज्जीवन व विकास दोन्ही सामील असतील.

धार्मिक सुधारणा व पुनरुज्जीवनासाठी अनेक वेगवेगळे दृष्टीकोन मांडणार आहे. पहिल्या दृष्टीकोनाचे जनक हिशेम डजेत (जन्म १९३५). ते सुचवतात की, जे देश इस्लामी कायदेप्रणालीत मागास आहेत, त्यांनी यात प्रगत असलेल्या देशांची कायदेप्रणाली कवटाळली पाहिजे. डजेत म्हणतात की, आपण हूदूद शिक्षापद्धती संपवली पाहिजे (ती उम्मईद खलिफांनी तेराशे वर्षांपूर्वी सोडली होती). त्याऐवजी आपला जोर वैयक्तिक स्थिती कायद्यावर लावला पाहिजे, ज्याची रचना मागे पडलेली असून तिचे आधुनिकीकरण करण्याची गरज आहे.

**सारख्याच शब्दार्थ कुळातील संज्ञा**

तजदीदचा (नूतनीकरण) अर्थ विस्तारणाऱ्या किंवा मागे टाकणाऱ्या अनेक शब्दांचा समूह आहे. अशा संज्ञांच्या शब्दार्थ मीमांसेतील अनेक घटक सारखेच आहेत. ते सर्व एकमेकांशी संबंधित आहेत. उदा. एकट्याने आणि सामूहिकरित्या, स्वतः आणि इतर, वस्तू आणि कल्पना, हे जग आणि येणारे जग. तसेच हे सर्व वाटचाल आणि नूतनीकरण याच्याशी संबंधित आहेत, उभारणी आणि योगदान, आणि एका स्थितीतून दुसऱ्यात स्थित्यंतर. काही शब्द एकमेकांना अगदी पूरक म्हणून वापरता येतात.

१) **तघयिर** : सामान्यतः बदल असे याचे भाषांतर केले जाते. क्रियापद घय्यारा (शब्दनाम तघयिर, न बदलणारा तघय्यारा) हे व्यक्ती वा वस्तूचे एका स्थितीतून दुसऱ्या स्थितीत होणाऱ्या बदलास वापरले जाते.

आपण जेव्हा एखादी गोष्ट बदलतो म्हणजे नेमके काय करतो. तर, आपण तिला आधीच्या रूपाऐवजी दुसरे रूप देतो. तघयिर किंवा बदल शब्दाने दर्शवणारी प्रक्रिया दोनपैकी एक स्वरूप घेते. एक तर ती बाह्य रूप बदलते किंवा सार आहे तसे ठेवून त्याचे स्वरूप बदलते किंवा सार बदलते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जाणीवेच्या दृष्टीने दुसऱ्या एखाद्या गोष्टीत अदलाबदल करते.

उदाहरणादाखल सांगायचे तर, अब्दुल मजीद अल नज्जर हे बदलाची प्रक्रिया दोन प्रमुख ध्रुवांवर केंद्रीत असल्याचे पाहतात. एक, आहे त्या वास्तवाला नकार; दोन, विद्यमान वास्तवाच्या जागी पर्यायी वास्तव बदलण्यासाठी बांधिलकी, सोबत पर्यायी वास्तव काय आहे याची स्पष्ट जाणीव आणि तो पर्याय प्रत्यक्षात आणण्याच्या मार्गांची मांडणी.

२) **इस्लाह** : सलाह या नामाचा अर्थ चांगुलपणा, रास्तपणा आणि मजबूत आहे. तो फसादच्या विरुद्धार्थी आहे.फसादचा अर्थ भ्रष्ट, ऱ्हास आणि उपद्रव. अस्लाह (नाम- इस्लाह) या शब्दरुपाचा अर्थ चांगले होण्यासाठी काहीतरी कारण बनणे, भ्रष्ट झाल्यानंतर चांगले किंवा उपयोगी बनणे, चांगले नसणे आणि उपद्रवी. थोडक्यात सुधारणा किंवा दुरुस्ती. या अर्थाने विरोधी जोडी म्हणजे मुस्लिह (सुधारक) विरुद्ध मुफसीद (भ्रष्ट करणारा, नुकसान करणारा) हे शब्द व्यक्ती किंवा समूहाला उद्देशूक्त संबोधता येतात.

३) **इहय्या** : त्रैमूळवर्ण इ-ह-य (नाम – हयाह आणि हयवान) हे म – व-त (नाम – मावत, उच्चार मौत, मावतान, उच्चार मौतान, अर्थ मृत्यू) याच्या विरुद्धार्थी आहेत. जीवन व मृत्यू जसे मानवप्राणी, जनावरे, वनस्पती आणि संपूर्ण ग्रहावर परिणाम करत असतात, तसेच ते संकल्पना, तत्त्वे, विचार प्रणाली व सिद्धांत यांच्यावरही परिणाम करत असतात. कुरआनाने सांगितले आहे, ‘अंध असणे आणि पाहता येणे हे एकसमान नाही, तसेच अंधार आणि प्रकाशाची खोली सारखी नाही, सावली आणि होरपळून टाकणारी उष्णता एकसारखी नाही आणि जीवंत आणि मयत हे एकसारखे नाहीत.’ (सुरह फातीर ३५:१९-२२) याचे विश्लेषण थाअलब यांनी जीवंत असणे हे मुस्लिम दर्शवते तर मयत ही संज्ञा इस्लामी संदेश

नाकारणारे दर्शवते, अशा शब्दांत केले आहे. आपण नूतनीकरण, बदल, सुधारणा, पुनरुज्जीवन किंवा पुनर्जागरण असे काहीही संबोधू शकतो, पण त्यांचे कार्य हे एकसमान असणार आहे आणि उद्देशही एक समान असणार आहे.

४) **बआथ** : त्रैमूळवर्ण ब-अ-थ हे चेतणे, चेतवणे, जागणे, उठणे, उभे करणे, हालचाल असे अर्थ ध्वनीत करतात. पारंपरिक वापरात बाअथा क्रियापद दोन प्रमुख अर्थ सांगण्यासाठी योजले जाते. एक आहे, पाठवणे. सुरह अल अरआफ ७:१०३ मध्ये अल्लाहने सांगितले, 'आणि त्यांच्यानंतर (आधीच्या लोकानंतर) आम्ही मोझेसला पाठवले (बाअथना) ...' आणि सुरह अल बकराह २:२१३ मध्ये 'एकेकाळी सर्व मानवजात एकच समुदाय होती, (नंतर वेगळे होणे सुरू झाले) जिथे ईश्वराने आनंदाच्या लाटेचा आणि खबरदारीचा संदेश देणाऱ्या पैगंबराना उभे केले (बाअथ)...दुसरा' अर्थ, पुनरुज्जीवन करणे किंवा पुन्हा जीवंत करणे. त्या अर्थाने सुरह अल बकराह २:५६ मध्ये आले आहे, 'पण, आम्ही तुम्ही मेल्यानंतर तुम्हाला पुन्हा जीवंत केले (बआथनाकूम) .....'

५) **नहदह** : त्रैमूळवर्ण न-ह-द वर जाण्याची हालचाल ध्वनीत करतो. जसे क्रियापद नहादा (नाम- नहद किंवा नुहूद), त्याची रूपे, इन्तहादा म्हणजे उठणे, नाम- नहदाह, नहद आणि नुहूद हे शब्द हालचाल, उठणे, आणि बळ एकवटणे असे अर्थ सांगतात. म्हणून न-ह-द मूळवर्ण हे आधीचे सर्व अर्थ (तघयिर, इस्लाह, इहय्या आणि बाअथ) धारण केले आहे. याचा कुरआनात कुठेही उल्लेख आलेला नसला तरीही ते सर्व अर्थ त्यात सामावलेले आहेत. याचा वापर सुन्नाहमध्ये झालेला आहे. प्रामुख्याने वापर धार्मिक प्रार्थनेतील शारीरिक हालचालींवरील लेखनात केलेला आहे. नहदाहचे अनेक अर्थ असले तरी बाराव्या शतकापासून प्रामुख्याने तो शब्द जागे होणे किंवा पुनर्जागरण या अर्थाने वापरले जात आहे. त्यामुळे बौद्धिक चळवळीशी जोडला जाऊन तो विचारवंतांच्या एका पिढीला जागरणाचे प्रवर्तक (रुववाद अल नहदाह) या अर्थाने चिकटला आहे.

प्रकरण पाचवे

## तकलीद, इत्तिबाअ व इज्तेहाद : परस्पर पूरक व विरुद्ध

इब्न फारीस (मृ.३९५ हि / १००४ इ.स.) यांच्या मते क–ल–द हे त्रैमूळवर्ण काफ, लाम व दाल आहेत. ते दोन अर्थ ध्वनीत करतात. एक लटकण्याची स्थिती किंवा काही तरी कशावर तरी वा कुणावर तरी लटकवून ठेवणे. दुसरा अर्थ नशीब किंवा नियती. किला दाहचे अनेकवचन (कलाइद) हे कुरआनात एकदा येते. त्यात वर दिलेला अर्थ सामावलेला आहे. सुरह अल माइदाह (५:२) मध्ये कलाइद हा शब्द बळी देताना जनावराच्या मानेभोवती घातलेल्या हाराला उद्देशून आला आहे. सुन्नाहमध्ये आएशा (रजि.) यांनी सांगितल्याप्रमाणे, मी पैंगबाराच्या बळीसाठी हाताने हार बनवला. (कलाइद हादी रसूल अल्लाह) नंतर त्यांनी ते घालून (जनावरांना) सजवले. (कल्लादाहा) कुरआनाने स्पष्ट केल्याप्रमाणे सुन्नाह कल्लादा (नाम– तक़्लीद) क्रियापद स्पष्ट करत नाही.

अल शातिबी यांनी इब्न मसूद यांच्या अल एतिशाम पुस्तकातील हवाला दिला आहे. इब्न मसूद म्हणतात, धर्माबाबत सावधगिरी बाळगा, अन्यथा तुम्ही धर्माबाबत एकमेकांची नक्कल कराल. एखादा विश्वास ठेवत असेल तर तुम्ही विश्वास ठेवाल, तो अविश्वास व्यक्त करत असेल तर तुम्हीही अविश्वास प्रकट कराल. असंख्य विद्ववानांनी अशी नक्कल करणाऱ्यास गंभीर नवपायंडा (बिदाह अझिमाह) म्हटले आहे. असा प्रकार इस्लामच्या आरंभीच्या शतकात नसल्याचेही सांगितले आहे. अल शौकानी यांच्या मते, तकलीद करणारी व्यक्ती कुरआनाची शिकवण समजून घेत नाही, पैगंबरांचे प्रासंगिक उदाहरण समजून घेत नाही. ती व्यक्ती इमामाच्या सांगण्याशिवाय दुसऱ्या कशाचाही विचार करत नाही. पण, जी व्यक्ती तिच्या इमामाच्या सांगण्यापलीकडे जाऊन कुरआन किंवा सुन्नाहचा आधार मागते तेव्हा ती मुकल्लीद (नक्कल करणारा) ठरत नाही. म्हणून त्यांनी तकलीदची व्याख्या अशी केली आहे, एखाद्याचे म्हणणे आहे तसे स्वीकारणे, त्या म्हणण्याला आधार किंवा पुरावा याची विचारणा न करणे म्हणजे तकलीद (नक्कल).

विरोधाभास असा की ज्या इस्लामी धर्मशास्त्राच्या विविध शाखांचा पाया घालणाऱ्या विद्वानांच्या सांगण्याची मोठ्या प्रमाणात नक्कल केली जाते, त्याच

विद्वानांनी अतिशय कठोर शब्दांत कोरडे ओढत तकलीदला मनाई केली आहे. उलट त्यांनी अभ्यास करण्यावर, इज्तिहादवर आणि पुरावे शोधण्यावर भर दिला आहे. अहमद इब्न हंबल यांनी समज दिली आहे. ते म्हणतात, एखाद्या व्यक्तीला तिचा धर्म दुसरा कुणीतरी समजावून सांगत असेल तर ते त्या व्यक्तीच्या दुर्लक्षाचे व अज्ञानाचे प्रतीक आहे. तक्लीदवर कठोर टीका करणाऱ्यांत नंतरच्या विद्वानांमध्ये सुधारणावादी चळवळीचे अनुयायी (अल हरकाह अल इस्लाहिय्याह) किंवा आधुनिक सलाफिझम (अल सलाफिय्याह अल हदीसियाह) चे विद्वान प्रामुख्याने येतात. तसेच त्यात त्यापासून निघालेल्या इतर शाखा व चळवळींच्या विद्वानांचा समावेश आहे. फाथी अल दुरयानी यांनी म्हटले आहे, आपल्या सांगण्याला कोणताही आधार किंवा पुरावा न देण्यात तक्लीद सामील असले. यात इस्लामी कायद्याचे उच्च हेतू सामावलेले नसतात. ते कोणत्याही प्रकारचा इज्तिहाद करत नाही. त्यात व्यक्तीसाठी कारणमीमांसा थांबवलेली असते. याचाच अर्थ तक्लीद म्हणजे ईश्वराने दिलेल्या विचार करण्याच्या, अर्थ लावण्याच्या आणि स्वतःला शिक्षित करण्याच्या जबाबदारीचा त्याग आहे. अल्लाहने सुरह अल् इसरा १७:३६ म्हटले आहे, आणि तुम्हाला माहिती नसलेल्या गोष्टींसाठी तुम्हाला निवाड्याच्या दिवशी जबाबदार धरले जाणार नाही. केवळ जे तुम्ही ऐकले, पाहिले आणि मनाने विचार केला या गोष्टींसाठी तुम्हाला जबाबदार धरण्यात येईल.

**मुस्लिम समुदायात इज्तिहाद व तकलीदची सामाईक व परस्पर विरोधी भूमिका**

बहुतांश विद्वान व इमाम तकलीदला काहीशा अनिश्चित अटींसह मनाई करतात. ही मनाई इज्तिहाद करण्याची पात्रता असलेल्या व्यक्तींसाठी आहे, ही नोंद घेतली पाहिजे. मात्र, मुज्तहिद म्हणून पात्र नसलेल्या पण, वेगवेगळे संदर्भ व पुरावे यांच्यात फरक करण्याचा विवेक असलेल्यांच्या बाबतीत स्थिती वेगळी आहे. त्यांना तकलीदची मनाई आहे की नाही यावर मत भिन्नता आहे. पण, जगण्याची भ्रांत असलेल्या सामान्य लोकांना, अशिक्षित लोकांना, कायदेविषयी निवाड्यात कारणमीमांसा करू शकत नाहीत, अशांना तक्लीदची मुभा आहे, यावर एकमत आहे. किंबहुना ती त्यांची गरज समजली गेली आहे.

तकलीदच्या समर्थकांनी त्याच्या दाव्यासाठी दिलेल्या पुराव्यांचे सखोल विश्लेषण केल्यास ते आपल्याला त्यांच्या दाव्याच्या विरुद्ध दिशेला पोचवते. कुरआन आणि सुन्नाह या दोन्ही आपल्याला शिकण्यासाठी, प्रश्न विचारण्यासाठी, पुराव्यांचा माग घेण्यासाठी आणि हे पुरावे नेतात त्या दिशेने जाण्यासाठी साद घालत असल्याचे आपल्याला आढळते. विशेष म्हणजे ही साद ज्या मजकुरात आढळते, तोच मजकूर तकलीदच्या पुरस्कारासाठी मजबूत आधार म्हणून व्यक्तिवाद करताना दिला जातो. सुरह अल नहल (१७:४३) मध्ये ईश्वर सांगतो, आणि तुमच्या आधी आम्ही पाठवलेले प्रेषित माणूसच होते, त्यांना आम्ही स्फुर्ती दिली, ही गोष्ट तुम्हाला उमजली नाही तर ज्यांच्याकडे संदेश आहे त्यांना विचारा.

या प्रश्नाशी संबंधित काही हदीस आहेत, त्या पैगंबरांच्या सहकाऱ्यांचे श्रेष्ठत्व सांगतात आणि धर्मपरायणाच्या बाबतीत त्यांचे अनुकरण करण्यास सांगतात. पैगंबरांच्या सहकाऱ्यांच्या कृतीचे अनुकरण हे सन्मार्गावरील खलिफांचे अनुकरण करण्याच्या पैगंबरांच्या आदेशानुसार आहे. याविरुद्ध पैगंबरांनी या किंवा त्या मुस्लिम विद्वानांच्या आचरण अनुकरणासाठी स्वीकारा, असा आदेश दिलेला नाही. किंवा मुज्तहिदची मते स्वीकारा, असेही सांगितलेले नाही. तसेच पैगंबरांच्या सहकाऱ्यांमध्ये उद्‌भवणारी मतभिन्नता हा इज्तिहादच्या प्रक्रियेतील गतिशीलतेचा पुरावा आहे. तसेच तो मुस्लिम मनाच्या सजीवतेचा पुरावा आहे. ही मतभिन्नतेची स्थिती ईश्वराने मुस्लिम समाजाला दिलेली कृपा आहे आणि ईश्वराच्या आदेशाचा अर्थ लावण्यासाठी आम्हाला मिळालेला अंक्षांश आहे.

खूप कमी मुस्लिम विद्वानांनी याची व्यवस्थित मांडणी केली आहे. त्यापैकी असलेल्या युसूफ अल करदावी यांचे उदाहरण देता येईल. त्यांनी न्यायिक पायंडे जारी करण्याबाबत एक दृष्टीकोन सिद्ध केला आहे. तो शिक्षणशास्त्राच्या अनेक पायांवर आधारीत आहे. त्यापैकी एक पाया म्हणजे, एखाद्याच्या फतव्याला पुरेसे विश्लेषण व स्पष्टीकरण देणे आहे.

मुस्लिम जीवनातील इज्तिहादची भूमिका आणि महत्त्व इब्न हज्म यांनी थोडक्यात प्रभावीपणे सांगितले आहे. ते लिहितात, 'ईश्वर आपल्याला काय सांगतो आहे, हे जाणून घेण्यासाठी आपल्याला जिथपर्यंत शक्य आहे इज्तिहाद करणे ही आपल्या सर्वांवरील जबाबदारी आहे.'

### इत्तिबाअ आणि तकलीद तुलना व विरोधाभास

इब्न फारिस (मृत्यू ३९५ हिजरी, इस १००४) यांच्या मते, त-ब-अ हे त्रै मूळवर्ण सातत्याने अनुसरण किंवा मागे चालणे याच अर्थाने येतात. हे मूळवर्ण याचे अर्थाने किंवा अलंकारिक अंगाने कुरआनात वारंवार आले आहेत. उदा. सुरह अल बकराह २:३८. इतर वेळी शब्दशः अर्थाने वापरले आहे. उदा. सुरह अल शुआरा २६:६०. इत्तिबाअ क्रियापद जबाबदारीतून एखाद्याला शरण जाणे असा अर्थही ध्वनीत करतो. उदा. सुरह अल् आअराफ ७:२०३. इथे पैगंबरांना हे सांगण्याची सूचना आहे, 'मी फक्त माझ्या पालनकर्त्याने मला जे काही उलगडून सांगितले, त्याचे पालन करतो (इन्नमा अत्तबिअऊ)...' इतरत्र एखादी गोष्ट दुसऱ्या मागून वारसाप्रमाणे येत असल्याचा अर्थ ध्वनीत करण्यासाठी वापरले आहे. जसे, सुरह अल् नाझिअआत सुरह अल् क़सास २८:४२ मध्ये क्रियापद अतबाअ सोबत जाणे किंवा पिच्छा पुरवणे या अर्थाने आले आहे. इथे फॅरोहचा आणि त्याचे यजमानांचा उल्लेख करताना ईश्वर जाहीर करतो, 'या जगात शाप त्यांचा पाठलाग करण्यास आम्ही कारण आहोत (अतबाअनाहम फी हदीही अल दुनिया लाअनतन )...'

पैगंबरांनी काही लोकांच्या गुलामासारख्या पूर्वजांचे अनुकरण करण्यावर टीका केली आहे. ते म्हणाले, तुम्ही खरोखर आधी होऊन गेलेल्या लोकांची परंपरा त्यांच्या हातावर हात मारून पुढे नेत आहात.असे असले तरी इत्तिबाअ व तकलीद याच्यात फरक आहे. इत्तिबाअ शब्द कुरआनाचे पालन करण्यासाठी योजला जातो. जिथे कुरआनाचे वचन उपलब्ध नसेल तिथे सुन्नाहचा हवाला असतो. जिथे हे ही नसेल तर मुस्लिम विद्वानांची भूमिका ज्यावर एकमत आहे ती गृहित धरलेली असते. यापैकी काहीही संदर्भ नसेल तर मात्र, इत्तिबाअ कामी येतो. तो हातातील परिस्थिती आणि त्यानुषंगिक कुरआनातील संदर्भ यांच्या नुसार क्रमप्राप्त तुलनात्मक विश्लेषणाचा आधार असतो. जिथे कुरआनाचा संदर्भ नसेल तिथे सुन्नाहचा संदर्भ तुलनात्मक विश्लेषणाचा आधार असतो. हे ही शक्य नसले तर आपले विद्वान जी भूमिका सांगतात तो आधार असतो. अर्थात ती भूमिका वैध, आणि कुरआन व सुन्नाहच्या क्रमप्राप्त तुलनात्मक विश्लेषणावर आधारीत हवी.

इब्ने तयमिय्याह यांनी तक्लीद सदोष, इत्तिबाअसाठी अमान्य असल्याचे स्पष्ट केले आहे. समकालीन विचारवंत ताहा अब्द अल रहेमान(जन्म १९४४) यांच्या मते इत्तिबाअ आणि तक्लीद यांच्यात एकच फरक आहे, तो म्हणजे पुरावे असण्याचा किंवा नसण्याचा. या दृष्टीने समजून घेतले तर इत्तिबाअ अशा स्थानाला चिकटलेले आहे, जिथे पुराव्याचा आधार आहे. तक्लीद अशा स्थानी आहे, जिथे पुराव्याचा आधार नाही. ऐतिहासिक दृष्ट्या तक्लीद आणि इत्तिबाअ यांच्यात कायदेशीर, शब्दशास्त्रानुसार आणि अंमल परंपरेने अतिशय मजबुतीने फरक केलेला आहे. जिथे आधीचा शब्द हा समर्थन करता येणार नाही आणि अमान्य अनुकरण याच्याशी संबंधित आहे. तर नंतर येणारा शब्द विचारपूर्वक, दमदार मान्यता असलेले इतर समानुकरण उदाहरण किंवा विद्वान स्त्री वा पुरुषाच्या विद्वत्तापूर्ण भूमिकेचा स्वीकार याच्याशी संबंधित आहे.

**भाग तीन : मुस्लिम समुदाय : अरब-इस्लामी विचारांत अधिकारवाणीची चौकट आणि वैश्विकता**

प्रकरण सहावे

# मुस्लिम समुदाय (अल उम्माह) नूतनीकरण व इज्तिहादची नियामक संस्था

### उम्माह संज्ञेचे विविध अर्थ आणि वापर

उम्माह शब्द कुरआनात पाच प्राथमिक अर्थाने आलेला आहे. १) समुदाय, सुरह अल बकरा, २:२१८ मध्ये आढळतो; २) युग किंवा काळ, सुरह यूसुफ १२:४५; ३) धार्मिक नेता, सुरह अल् नहल १६:१२०; ४) जातकूळ किंवा प्रजातीशी संबंधित, सुरह अल् अनआम ६:३८; ५) श्रद्धा किंवा प्रचलन, सुरह अल् झुख्रूफ, ४३:२२. उम्माह शब्दाचा वर दिलेल्या यादीतील पहिल्या अर्थामध्ये लोक, कुळ, जमात आणि असे इतर घटक जे जगभर आहेत; जे देशाचे नागरिक म्हणून नव्हे तर समान श्रद्धा आणि इस्लामी कायद्याला बांधील, इस्लामी रीतीरिवाज, मूल्ये यांना मानणारे आहेत. हा समुदाय ज्याला इतिहास आहे, तो जय-पराजयाने भरलेला आहे, जिथे आनंद व दुःख, आशा व निराशा आहे. परिणामी जगात मुस्लिम उम्माह एकच आणि एकच आहे, जरी अनेक मुस्लिम लोक असले किंवा स्थानिक समुदाय असले तरीही.

मुस्लिम उम्माहची वैशिष्ट्ये सांगणारे अनेक गुण कुरआनाने सांगितले आहेत. यापैकी तीन प्रमुख म्हणून ओळखले जातात, नियमन, निवडले जाणे, आणि त्रास किंवा परीक्षा. युरोपीय शब्द राष्ट्र (नेशन) हा साधारपणे अरबी शब्द उम्माहच्या भाषांतरासाठी निवडला जातो. तो ऐतिहासिक घडामोडींनी प्रभावित आहे; जसे, राजकीय राज्य (दऊलाह) आकारास येणे. पाश्चात्त्य अभिसंस्कृतीत उम्माह संज्ञेचा वापर वाढण्यामागे पूर्वीच्या सर्व धार्मिक इमारतींच्या अवशेषांच्या पायावर नवे उभे राहात राष्ट्रीय ओळख तयार होण्याच्या काळात ती संज्ञा आलेली आहे. म्हणून उम्माह संज्ञा पाश्चात्त्य साहित्यात दऊलाह किंवा राजकीय राज्य या अर्थानेही वापरली गेलेली आहे.

अरब–मुस्लिम उम्माह एका ऐतिहासिक प्रक्रियेतून आकारास आलेले आहे. ज्यात इस्लामी संदेश आणि त्याच्या भाषेच्या प्रसाराने महत्त्वाची प्रमुख भूमिका पार पाडली आहे. यात भौगोलिक घटक दुय्यम स्थानी होते. सांस्कृतिक वैविध्य आणि विविध संस्कृतीचे असंख्य सदस्य असताही अनेक शतकांच्या काळात मुस्लिम उम्माह टिकला आणि जोमाने वाढलाही. या वस्तूनिष्ठ पैलूत वैश्विकता आणि इस्लामी संदेशाचे अंतिमत्व यांचा समावेश आहे. हा संदेश आत्मसात करणे आणि गतकाळाचा वारसा पुनरुज्जीवित आणि नूतनीकरण करण्यासाठी आलेला आहे.

**मुस्लिम समुदायासाठी सहमतीचा अर्थ व महत्त्व**

विद्वान ज्ञानाची दोन वर्गात विभागणी करतात; १) सामान्यांचे ज्ञान (इल्म आम्मह) २) विद्वानांचे किंवा अभिजनांचे ज्ञान (इल्म खास्सह). जर ज्ञान सहमतीच्या प्रश्नासंदर्भात असेल तर त्याचे दोन भाग करतात, १) सामान्यांची सहमती (इज्माअ आम्मह) २) विद्वानांची सहमती (इज्माअ खास्सह). अल शाफिई यांच्या मते पहिला वर्गसामान्य ज्ञानाचा आहे, जिथे चुकीचे काही नाही वा चुकीचा अन्वयार्थ नाही, किंवा वादाचा विषयही नाही. जेव्हा सहमती आकाराला येते तेव्हा विद्वानांची जबाबदारी आहे की त्यांनी संपूर्ण मुस्लिम समुदायाला सहभागी करून स्पष्टीकरण देणे, सूचना देणे आणि मूर्त उपयोग सांगणे, आणि समुदायाच्या प्रत्येक सदस्याला चर्चा आणि वापराच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची मुभा देणे. अर्थात त्या त्या व्यक्तीच्या समजनुसार आणि पात्रतेनुसार.

आपला समाज आपल्या आजच्या काळस्वयंचलन, कप्पेबंदपणा, पक्षाभिनिवेश, मागासलेपण, दुबळेपणा, आणि निर्णय प्रक्रियेची उतरंड याने ग्रासलेला आहे. अशा स्थितीत ऐक्य आणि सर्व क्षेत्रात दैवी एकात्मतेस मान्यता देणाऱ्या व्यापक सहमतीची गरज इतर कोणत्याही काळापेक्षा आज सर्वात जास्त आहे. सहमतीच्या (इज्माअ) तत्त्वाचा आणि सल्लामसलतीचा (शुरा) उद्देश सर्व मुस्लिमांना सर्वत्र नेहमीच लागू होणे आहे. या दोन्ही गोष्टी विद्वानांच्या समुदायासाठी राखीव ठेवल्या आहेत. त्याच्या समर्थनाचे एकमेव कारण म्हणजे, वेगवेगळी पार्श्वभूमी आणि राष्ट्रीयता असलेल्या मुस्लिमांची वाढती संख्या. या अफाट संख्येशी संपर्क साधणे व ठिकठिकाणी प्रवास करण्यावर येणारी मर्यादा.

इस्लामच्या मजबूत समजुतीची शाश्वती देणारे एक महत्त्वाचे साधन म्हणजे, मुस्लिम समुदाय शतकांपासून सहमत असलेल्या श्रद्धा, तत्त्वे आणि विचारप्रणाली यांचा अंगीकार. या तिन्ही घटकांनी मुस्लिम समुदायाची जीवनमूल्ये, रीतीरिवाज, परंपरा यांना आधार दिला आहे. हे वास्तव खूप पलीकडे जाते. हे वास्तव निव्वळ विद्वत्ता, वादग्रस्त होण्याची सुप्त क्षमता, लोकांच्या रोजच्या जीवनातील सहमती, आणि त्यांना सर्वांत जास्त प्रिय वस्तू म्हणून उराशी कवटाळतात यांच्या पलीकडे जाते.

प्रकरण सातवे

# नवप्रवर्तन व प्रगतीला आधार देणारे अधिकारवाणी असलेले संदर्भ बिंदू

## मर्जाइय्याह संकल्पना आणि ओळखीचा प्रश्न

र-ज-इ हे त्रैमूळवर्ण परतीचा अर्थबोध करतात. या त्रैमूळवर्णापासून व्युत्पन्न शब्द सुरह अल् आलाक ९६:८ मध्ये येतात. ज्यात म्हटले आहे, शेवटी तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडे परतायचे आहे (इन्ना इला रब्बिका अल रुजा ). म्हणून मर्जाइय्याह शब्द एखादा ज्याच्याकडे परततो, या अर्थाने वापरला जातो. म्हणजेच, लोक एखादा पेच किंवा मतभेदाची स्थिती सोडवण्यासाठी एखाद्याकडे आवाहन करतात. तो एखादा वैश्विक, सर्वसमावेशक तत्त्व असतो.

आजच्या घडीला मुस्लिम समुदायाला थोडेशीही मतभिन्नता, मतभेद किंवा विरोधाभास परवडणारा नाही. जो कोणा काळी मुस्लिम संस्कृती व अभिसंस्कृती मजबूत आणि उत्कर्ष बिंदूवर असताना सामावून घेतला गेला. परिणामी ती मजबूत, सर्वसमावेशी आणि स्वायत्त होती. आजच्या परिस्थितीत नाजूक पेचप्रसंगांच्या बाबतीत निश्चित ध्येय्याच्या दिशेने आणि स्पष्ट व निश्चित पावले उचलण्याची गरज आहे. त्यासाठी व्यापक एकीकरण आवश्यक आहे. बुरहान घलियोन यांच्या मते, अरब समाज ज्या नैतिक पेचप्रसंगातून जात आहे, त्यातून त्या समाजाकडे नैतिक मूल्यांना विवेकी आधार देण्यासाठी आवश्यक आधुनिकीकरण नसल्याचे व्यक्त होत आहे. त्याच वेळी या नीतीमूल्यांना असलेला धार्मिक आधारही नष्ट होत आहे.

अब्दुलहमीद अबुसुलेमान हे समाजीय आणि धर्मीय घटक संतुलीतपणे सामावून घेण्याचे सूचवतात. त्याच्या मते, अधिकारवाणी असलेली संदर्भ साधने ती आहेत, जी जर मुस्लिम समुदाय त्यांच्या भोवती एकत्र होत असेल आणि त्यांना कृतीसाठी मार्गदर्शक म्हणून वापरत असतील, आणि समुदायाच्या नाना प्रवाह आणि विचारप्रणालीतून समुदायाच्या सदस्यांमध्ये निर्माण झालेल्या विविध वादांची सोडवणूक करत आतापर्यंत चालत आलेल्या ऐक्याची खात्री देतील. यात प्रत्येक समुदाय तरून जाण्याची आणि

विकसित होण्याची आशा बाळगत ज्ञान आणि तंत्रज्ञानाची भर घालत असतो. त्यासोबत त्याला तग धरण्यासाठी आणि प्रेरीत करण्यासाठी, समुदायाचा अनुभव एकत्र गुंफण्यासाठी, प्रभाव टाकण्यासाठी आणि त्याच्या प्रतिक्रियांना दिशा देण्यासाठी, आणि संपूर्ण लक्ष केंद्रीत करण्यासाठी अधिकारीक आध्यात्मिक, सांकेतिक आणि नैतिक चौकटीची गरज असते.

अधिकारवाणी असलेली वैध, स्वयंआधिकारीक साधने प्रामुख्याने तीन पायावर आधारीत असतात. १) संदेश अवतरण, २) मानवी तर्कबुद्धी, आणि ३) विश्व. आधिकारीक असण्याचा विषय, आणि आम्ही ज्या संदर्भ साधनांचा वापर करतो, ती ओळखीच्या प्रश्नाशी जोडलेली असतात. इतर समुदायांप्रमाणे मुस्लिम समुदायाची किंवा उम्माची ओळख दोन मूलतत्त्वांवर आधारीत असते. १) सदस्यांना एकमेकांशी बांधणाऱ्या नातेसंबंधाचे स्वरूप, २) या स्वरूपाला जन्म देणारा वैचारिक तानाबना.

**आधिकारिक आणि युरो–अमेरिकाकेंद्री वाद**

काही विशिष्ट पद्धतिशास्त्रीय पायांना रचण्याची सुरुवात आपल्या स्वतःच्या आधिकारीक साधनांच्या संकल्पनांना इतर साधनांच्या संबंधात आकार देत केली पाहिजे. आपण जर पट्टीच्या दोन बाजू म्हणजेच संपूर्ण नकार व संपूर्ण स्वीकार ही पाश्चात्य अभिसंस्कृतीची पद्धत वगळली, तर आपल्याला इतर अनेक दृष्टीकोन सापडतील. स्व व पश्चिमबाबत सातत्यहीन अभिवृत्ती दाखवणारे दृष्टीकोन सापडतील. तर आपल्याला ज्याची गरज आहे तो दृष्टीकोन म्हणजे, माहिती व आधिकारिकतेची चौकट हाताळताना जो काय स्वीकारले पाहिजे आणि काय नाकारले पाहिजे हे सांगणाऱ्या पद्धतिशास्त्राचा पाया घालतो.

पश्चिमेत अनेक दशके जीवन घालवणारे अल्जेरियन विद्वान मोहम्मद अरकोउन (१९२८–२०१०) यांनी इस्लामी आणि युरोपीय विचारांतील दुवा म्हणून भूमिका बजावण्याचे काम केले आहे. याकामी त्यांनी आयुष्य खर्ची घातले आहे. असे असले तरी त्यांनी निरीक्षण नोंदवलेल्या पश्चिमेच्या इस्लामविषयी न बदलणाऱ्या आणि तुच्छतादर्शक दृष्टीवर प्रभाव टाकण्यात ते सरते शेवटी अपयशी ठरले. इतकेच नव्हे तर मुस्लिम विद्वान म्हणून स्वतःविषयीचा पाश्चिमात्त्यांचा दृष्टिकोन बदलण्यातही ते असमर्थ ठरले. त्यांनी

सरतेशेवटी म्हटले आहे, ‘आपल्याला हा निष्कर्ष काढण्याशिवाय पर्याय नाही. वारंवार येणारे अपयश हे या दृष्टीत बदल अशक्य असल्याचे सांगत नाहीत. तर ते अरब व इस्लामी धोरणातील चूक सांगतात; जी स्वतःमध्ये काहीही बदल न करता आपल्याविषयी पश्चिमेची दृष्टी बदलण्यावर पूर्णपणे कलली आहे... आपण स्वतःला बदलत नाही तोवर आपल्याविषयी इतरांचे मत बदलत नाही.’

प्रकरण आठवे

# वैश्विकता : बदल–बदलोन्मुख कृती आणि तिच्या झेपेचा जागतिक परीघ

## वैश्विकतेची संकल्पना

प्राच्यविद्या पंडित आणि इतर विद्वानांनी असा दावा केला आहे, की प्राचीन आणि आधुनिक या दोन्ही काळात इस्लाम खऱ्या अर्थाने वैश्विक नाही किंवा विविध लोक आणि विविध संस्कृती यांना सामावून घेण्यात सक्षम नाही. याच्या समर्थनार्थ केला जाणारा प्रमुख युक्तीवाद असा : १) कुरआन अरबी भाषेत आहे आणि म्हणून ते केवळ अरबच समजू शकतात; २) विशिष्ट स्थितीत आणि विशिष्ट परिस्थितीला प्रतिसाद म्हणून कुरआन अवतरले आहे. ते अरबद्वीपात सातव्या शतकात राहणाऱ्यांना लागू पडणारे आहे; आणि ३) आरंभीच्या काळात पैगंबरांनी वैश्विक संदेश आणत असल्याचे सांगितले नव्हते.

इब्ने अशर यांनी स्पष्ट केले आहे, की, पैगंबरांच्या काळात अरब हे चार गुणांबाबत इतर जगापासून अलग होते. १) चांगली माणसे, २) आठवणींचा मजबूत वारसा, ३) साधी अभिसंस्कृती आणि साधे कायदेसंकेत, ४) जगातील इतर लोकांपासून सापेक्ष अलगता. ही गुण वैशिष्ट्ये अरबांसाठी इस्लामचा संदेश स्वीकारणे, तो समजणे आणि त्याचा प्रसार करण्यासाठी पात्र ठरली. त्यामुळे असे दिसून येते की, पैगंबरांच्या सादेत आणि त्यांच्या उदाहरणांमध्ये पूर्वसुरी प्रेषित नूह, अब्राहिम, मोशू आणि येशू यांची परंपरा आढळते.

वैश्विकतेचे एकेश्वरवादी आयाम, आपण प्रार्थना करतो त्याच्या एकत्वावर आधारीत आहे. ते मुस्लिम समुदायाला उद्देश आणि दिशेबाबत धुरीणत्वाच्या अंगाने, समाजाची प्रगती आणि विकास, कायदा व्यवस्था, आणि अनुस्यूत तत्वज्ञान यांना एका सूत्रात बांधते. अलालवनींच्या मते, माणूस विधायक भूमिका पार पाडण्यासाठी बनवला गेला आहे. मुस्लिम सदस्यांना त्यांची ही भूमिका पार पाडण्यासाठी त्यांच्यातील बदल घडवण्याच्या बांधिलकीचा केवळ फेर शोध घेण्याची व फेर सक्रीयतेची गरज

आहे. तसेच स्वविषयी आणि त्यांच्या ध्येयाविषयी जागरूक होण्याची गरज आहे. अर्थात हे त्यांनी प्रकटलेल्या दैवी संदेशाच्या आधारे करायचे आहे. मुस्लिम समाज स्वनियमन आणि इतरांच्या जीवनात सक्रीय सहभागाच्या पथावर स्थिर मार्गक्रमण करत आहे. सगळ्यांचे स्वागत करणारी सर्वसमावेशी मानसिकता, आणि प्रतिष्ठा लाभलेला सर्व स्वरूपातील खास अमोघ संवाद, ईश्वरी ग्रंथाच्या मार्गदर्शनावर कार्यरत असणारे सरकार, आणि कुणावरही अन्याय, वाजवीपेक्षा जास्त भार न टाकणारा तसेच, घातक गोष्टींची मनाई करणारा कायदा या त्याच्याकडील गोष्टींची जगाला गरज आहे.

## समकालीन अरब-इस्लामी मांडणीत वैश्विकता आणि विशिष्टता

जगाला भेडसावणाऱ्या समस्यांची उकल करताना दोन पद्धतींवर जोर देणारे दिसतात. एक वर्ग विशिष्टतेचा त्याग करून वैश्विकतेचा आग्रह धरतो. तर दुसरा वर्ग विशिष्टतेचा आग्रह धरतो, प्रसंगी तो वैश्विकतेचा त्याग करण्याची किंमतही चुकवतो. हे दोन्ही कल या गृहितकावर आधारीत आहेत की एका बाजूला वैश्विकता, तर दुसऱ्या बाजूला विशिष्टता हे जात्याच अक्षम आहेत. त्यामुळे यापैकी कोणता एक कल मान्य केला तर दुसरा कल आपोआप नाकारला जातो. खोडला जातो. पण, मुळातच हे गृहितक चुकीचे आहे.

खुलेपणा आणि सर्वसमावेशक तत्त्वज्ञानाचे मूर्त निमंत्रण या पार्श्वभूमीवर इस्लामी वैश्विकवादाने समुदायांच्या राष्ट्रीय ओळखीचे संरक्षण करण्यात स्वतःला सिद्ध केले आहे. अगदी तिच्या क्षेत्रात ऐतिहासिकरित्या टकरीची स्थिती निर्माण झाली तेव्हाही. बुरहान घालिऊन यांच्या मते, ओळख सिद्ध करण्याची ध्येयासक्ती वैश्विक व्यवस्थेला विरोध करत नाही. या उलट अशी ध्येयासक्ती वैश्विक व्यवस्थेचा आविष्कार करणारी असते. विशिष्ठतेला मान्यता देण्यास विरोध करणारी कोणतीही वैध वैश्विक व्यवस्था ही इतरांप्रती असलेली जबाबदारी नाकारते, आणि इतरांना ती तिच्या हेतूसाठी केवळ कच्चा माल समजून वागणूक देते, किंवा जास्तीत जास्त चांगले म्हणून दुय्यम स्थान देते.

मलिक बेननबी यांच्या मते, कोणत्याही माणसाची नियती सर्वसमावेशकपणे त्याच्या भौगोलिक सीमांच्या पलीकडच्या घटनांनी व घटकांनी ठरत असते. विशेषतः आपण जगत असलेल्या आजच्या युगात

संस्कृतीची व्याख्या आणि निश्चिती जागतिक संदर्भाने केली जाते. एखादी संस्कृती तिची मूल्ये व संकल्पना तिच्या ज्या  साधनांमधून घेते, जे विषय ती स्वीकारते, ज्या सादला प्रतिसाद देते, आणि कृती करते, या सर्व गोष्टी निव्वळ तिच्या भूमीत निर्माण होतात, असे नाही. परिणामी मुस्लिम विद्वानांवर जबादारी येते, की त्यांनी गोष्टी शक्य तितक्या व्यापक मानवी दष्टीकोनातून पाहिल्या पाहिजेत. जेणे करून त्यांनी आणि त्यांच्या समाजाने, तसेच त्यांच्या संस्कृतीने जगात कोणती भूमिका पार पाडायची आहे, हे त्यांना कळेल. अल जबिरी यांच्य मते, इस्लामची भूमिका सामाजिक सौहार्दाचा आदर्श घालून देणे आहे. वेगवेगळी पार्श्वभूमी, वेगवेगळे राष्ट्रीयत्व असलेले श्रद्धाळू गोळा करून या संमिश्र मानवांचे स्वओळखीची स्पष्ट जाण असलेल्या जागतिक समुदायात (उम्माह) रूपांतर करणे आहे. अरब व इस्लामी विचारांत उम्माहच्या (जागतिक समुदाय) मूलतत्त्वांचे पुनरुत्थान व वैश्विकता हे सुधारणा, नवीकरण व बदल यांच्या पद्धती व त्याविषयी दृष्टीकोनात गुणात्मक बदल दर्शवतात. आपण एक तर निर्णय प्रक्रियेतील आव्हाने पेलण्यासाठी उठून उभे राहिले पाहिजे, नाही तर सत्तेत काबीज असलेले इतर आपल्यासाठी निर्णय घेतील आणि ते आपल्याला स्वीकारावे लागतील.

**भाग चार : सुधारणा व पुनरुज्जीवन चळवळ सांगणाऱ्या इज्तिहाद संबंधी विचारांचा पाया आणि तिचे अपयश सांगणारे घटक**

प्रकरण नववे

# अरब जागरण, राष्ट्रवादी व धर्मनिरपेक्ष मांडणी, आणि उच्चभ्रूंच्या विचारातील आधुनिकता

## संस्कृती आणि तिचा बदलाशी संबंध

माणसावर जन्मापासून प्रभाव टाकणारे नैतिक गुणविशेष व सामाजिक मूल्ये यांची गोळा बेरीज म्हणजे संस्कृती असे म्हणता येईल. बुरहान घालिऊन यांच्या मते, जैव संस्कृती ती आहे, जी तिच्या ज्ञानात किंवा कल्पनेत नव्या घटकांची भर टाकते. अर्थात ते घटक तिच्या मागील अनुभवांनुरूप असतील तरच. मग ते नवीन घटक संस्कृतीच्या विद्यमान नैतिक, बौद्धिक व धार्मिक ताना-बान्यात स्वीकारले आणि सामावले जातात.

संस्कृती आकारास येण्याच्या प्रक्रियेविषयी बेननबी सांगतात की, विशिष्ट स्थळ व काळात उदयास येणाऱ्या संस्कृतीचे स्वरूप हे लोक जगाकडे कसे पाहतात, यावर ठरत असते. तर घालिऊन नोंदवतात, की ज्यांचे राज्य नष्ट झाले आहे आणि वसाहतवादामुळे ज्यांची अर्थव्यवस्था डळमळीत झाली आहे, किंवा ज्यांच्या अर्थव्यवस्थेत भांडवलशाही आलेली असून तिचा त्यांच्या प्राप्त परिस्थितीशी, त्यांच्या गरजांशी एकअंशीही मेळ बसत नसताना, त्यांनी संस्कृती ही विरोधाचे साधन म्हणून निवडली. अनेक दशकांच्या अहिंसक विरोधानंतर त्यांनी स्वतःला नवा देश नवे राज्य म्हणून पूनर्स्थापित केले आहे. यावरून असे दिसते की, संस्कृती जतन करण्यात यशस्वी ठरलेल्या लोकांचा राजकीय व आर्थिक व्यवस्थेत झालेले मोठे बदल देखील पराभव करू शकले नाहीत. म्हणजेच त्यांची विशिष्ट विचारसरणी आणि मूल्ये, वास्तव समजून घेण्याचा त्यांचा अद्वितीय मार्ग त्यांनी जतन केल्याने त्यांचा पराभव होऊ शकला नाही.

## राष्ट्रवादी विचार –पुनरावलोकन व दुरुस्तीच्या मार्गावरील थांबे

राष्ट्रवादी विचारांचे मूल्यांकन व त्यांची दुरुस्ती करताना आपल्याला खूप मागे जावे लागेल. अगदी त्या सुरुवातीच्या काळी जेव्हा राष्ट्रवादी विचाराने पहिल्यांदा स्वतःला निधर्म संकल्पनेत जाहीर केले. ऑटोमन साम्राज्य युगाच्या शेवटच्या टप्प्यात (उत्तर एकोणिसावे शतक व विसाव्या शतकाचा आरंभ) ख्रिस्ती व मुस्लिम अल्पसंख्याकांनी स्वतःचा तुर्की करणापासून बचाव करण्याचा प्रयत्न केला. ते तुर्कीकरण काही धार्मिक आधारे नव्हते, तर निधर्म विचारातून केले जात होते. जागतिक समाजवादी विचाराच्या युरोप व इतरत्र प्रसाराने, स्वतःसाठी समाजवाद स्वीकारलेला अरब राष्ट्रवादी विचार हा तत्कालीन अरब जगाच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय समजला गेला.पण, अरब राष्ट्रवाद त्याच्या अरबांना एकत्र करण्याच्या ध्येयपूर्तीत अपयशी ठरला. तसेच अरब–मुस्लिम समुदायाची साधने विकसीत करण्यातही अपयशी ठरला.

जिथे राष्ट्रवादी प्रवाहाने राजकीय सत्ता हस्तगत केली, तिथे त्यांच्यासाठी राजकीय सत्ताच एकमात्र महत्त्वाची बाब बनली. परिणामी अशा राष्ट्रवादी प्रवाहात स्थानिक पातळीवर साचलेपण आले. ते आहे ती स्थिती कायम ठेवण्याच्या प्रयत्नात वाहात गेले. राष्ट्रवादी प्रवाह त्याची विधायक भूमिका, त्याला जन्माला घालणाऱ्या प्रेरणा आणि खऱ्या ऐक्यासाठी उत्साह हरवून बसला आहे. अल्पसंख्याकांना आत्मसात करणे आणि सामावून घेण्याबाबत इस्लामने आपल्याला ऐतिहासक नमुना घालून दिला आहे. हजरत बिलाल इब्न रबाह (हब्शी), सुहेब अल रुमी (मूळचे बैजाइंतीन), आणि सलमान अल फारसी (इराणी) हे अरब वंशाचे नसल्याने त्यांचा काही अरबांनी अवमान केला. हे ऐकल्यानंतर पैगंबर, लोकाना म्हणाले, तुम्ही तुमचे अरबीपण आई किंवा वडिलांकडून वारशाने घेऊन येता असे नाही. उलट ते तुम्ही बोलत असलेल्या भाषेतून आले आहे. जो कोणी अरबी बोलतो तो अरब आहे. त्यानंतर अरब उम्माहचा परिघ विस्तारला. ज्या कोणाचेही संस्कृती, विचार करण्याची पद्धत. बांधिलकी आणि एकनिष्ठता याच्या बाबतीत अरबीकरण झाले, त्याला त्यात सामावून घेण्यात आले.

**एरव्ही संदिग्ध वाक्चातुर्य**

मला अनेकवेळा समकालीन अरब विचारासंदर्भात निधर्मवाद आणि ख्रिश्चन विचारासंदर्भातील त्रिदेव यांच्यातील साम्याची आठवण होते. कोणालाही दोन्ही बाबतीत मोघमपणा, संभ्रम दिसतो; एक ठाम व संदिग्ध भूमिकेचा अभाव जाणवतो. इंग्रजी शब्द सेक्युलॅरिझम अनेक युरोपीय भाषांमध्ये आढळतो. तो लॅटिन भाषेतील सेक्युलम शब्दापासून आला आहे. त्याचा अर्थ युग, कालखंड, पिढी किंवा शतक असा अर्थ आहे. फ्रेंच शब्द लायसिस्मे धर्माला किंवा मरणोत्तर जीवनाला सार्वजनिक किंवा खासगी जीवनात महत्त्व न देणाऱ्या व्यवस्था किंवा तत्त्वज्ञान या अर्थाने वापरला जातो. सेक्युलर शब्दाविषयी सांगायचे तर तो पहिल्यांदा १६४८ च्या वेस्टफालिया शांती कराराच्या वेळी वापरण्यात आला. त्याला अनेक इतिहासकार पश्चिमेतील निधर्म विचाराचा पूर्वप्रवर्तक म्हणून मान्यता देतात.

पश्चिम जगातील निधर्मीकरण हा तेथील घटनांचा नैसर्गिक परिपाक होता. धर्माविरुद्ध उफाळलेली उग्र प्रतिक्रिया ही स्वतः चर्चच्या उत्तर उग्र प्रतिक्रियेसारखी होती. चर्च धर्माचा अन्वयार्थ लावण्यावरील एकाधिकार पूर्ववत ठेवू पाहत होते. या संघर्षातून तिथे निधर्मीकरण आले. याने अरब-इस्लामी समाज लक्षणियरित्या प्रभावित झाले. हे प्रामुख्याने तीन मार्गाने झाले. वसाहतवाद, शैक्षणिक मिशन (यात अरब मुस्लिम विद्यार्थी शिकण्यासाठी पश्चिमेत पाठवले गेले) आणि अरब-इस्लामी देशांत ख्रिस्ती शिक्षण संस्थांची उभारणी. तसेच पश्चिमेच्या विकासासोबत गती राखण्याची पूर्वेची प्रचंड आकांक्षा.

अरब जगतात धर्मनिरपेक्षतेने स्वतःला भौतिकवादी, निरईश्वरवादी व धर्माशी सहानुभूती नसलेला प्रवाह म्हणून मांडले आहे. तसेच धर्मनिरपेक्षता शब्दासोबत येणाऱ्या अडचणी असतानाही, आपण मुस्लिम जगातील धर्मनिरपेक्षतेच्या इतरांच्या प्रयोगांची नक्कल करण्याची राजकीय व्यक्ती व विद्वानांकडून साद ऐकतो. यातून मुस्लिम समाजाच्या ऐतिहासिक व धार्मिक वास्तवतेचा अनादर प्रकट होतो. धर्मनिरपेक्षतावादी विचार खऱ्या व प्रभावशील बौद्धिक पेचप्रसंगातून जात आहे. परिणामी सरसकट, चिकित्सा न करता तिचा स्वीकार होतो. सेमॅन्टीकसाठी उपऱ्या असणाऱ्या वातावरणात

जन्मलेल्या संकल्पनेचा, ती तिच्या धार्मिक, ऐतिहासिक  व सामाजिक वैशिष्ट्यांसह तिचे उगम क्षेत्र असलेल्या पश्चिमेत कशी काम करते आणि पूर्वेच्या संस्कृतीत कशी काम करते याची स्पष्ट जाण नसताना सरसकट स्वीकार होतो. बहुप्रमाणात कायद्यावर आधारीत असणारा, समाजाचा पाया असणारा धर्म काढून घेणे आणि सामाजिक व राजकीय जीवनातून वगळणे म्हणजे या धर्माला इन्कार करण्यासारखे आहे. जीवनाच्या सर्व अंगांबाबत शिकवण देणरा धर्म, काही बाबतीत टाळण्यासाठी तो वेगवेगळ्या भागांत विभागला जाऊ शकत नाही.

प्रकरण दहावे

# इस्लामी सुधारणा : चळवळीचे नमुने आणि सुधारणा कार्यक्रम सामाजिक व सांस्कृतिक कोलमडी मागील ऐतिहासिक घटक

मुस्लिम जागतिक समुदायामधील दौर्बल्य व त्याच्या ऱ्हासाच्या कारणांची चर्चा करणारे साहित्य खूप महत्त्वाचे आहे. दुर्दैवाने तसे साहित्य संख्येच्या व गुणवत्तेच्या दृष्टीने पुरेसे नाहीत. इस्लामी सुधारणांची जबाबदारी असलेले अनेक महत्त्वाचे विद्वान आहेत. इमाम गजाली यांनी त्यांच्या इहया उलूम अल दीन (धार्मिकशास्त्रांचे पुनरुज्जीवन) या हिजरीच्या पाचव्या शतकातील (इ.स. चे अकरावे शतके) ग्रंथात सम्यक खिलाफतीचा शेवट घडवणाऱ्या घटनांची प्रदीर्घ चर्चा केली आहे. अल गझाली यांनी इस्लामच्या बौद्धिक वर्तुळातील पेचप्रसंग कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यातून अनेक पातळीवर दृष्टीकोनात झालेले बदल आपल्या लक्षात येतात. पैगंबरांचे सहकारी, त्यांचे वारसदार आणि त्यांचे अनुयायी यांनी ज्या पद्धतीने धार्मिक ग्रंथ समजून घेत निष्कर्ष काढले, तसेच विरोधकांसोबत मतांची खुल्यापणाने देवाणघेवाण, वाद-संवाद, चर्चा केली, यातील बदल लक्षात येतात.

गुदमरून टाकणारे अज्ञान, अत्याचार, आणि दांभिकता यांनी मुस्लिम समुदाय ग्रासलेला असतानाही सुधारणावादी ध्येयाने प्रेरीत अल गझाली आणि त्यांच्या नंतरच्या लोकांनी संपूर्ण इस्लामी इतिहासात यशस्वीरित्या नवीकरण केले.या प्रेरणेने झपाटलेले एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे खुद्द जमालुद्दीन अफगाणी. या अवनतीला जबाबदार घटक पुढील प्रमाणे सांगता येतील, १) अवनतीचे मूळ कारण धर्म, त्याचा कायदा, पायंडा, तिची तत्त्वे आणि नैतिक मूल्यांपासून मुस्लिमांचे दूर जाणे, २) मुस्लिम समुदायातील विद्ववत्ता ऐक्याच्या ऱ्हासाच्या परिणामी लोक पंथ आणि विचारशाखांमध्ये विभागले गेले, ३) राजकारणी व विद्वतजन एकमेकांपासून दुरावल्याने खिलाफतीची व्यवस्था आणि राज्य कारभार भ्रष्ट झाले, तसेच जुलूम, अन्याय, समुदायाच्या हितापेक्षा वैयक्तिक स्वार्थाला प्राधान्य, परकीय आक्रमणे, त्यामुळे झालेली मुस्लिम समुदायाच्या आर्थिक व पायाभूत सुविधांची मोडतोड.

सुधारणा चळवळीचे नेतृत्व त्याकाळी जमालुद्दीन अल अफगाणी, मुहम्मद अब्दुह, मुस्लिम ब्रदरहूड (बंधुत्व) संघटनेची स्थापना करणारे हसन अल बन्ना (१९०६-१९४९) यांनी केले. इजिप्शियन विद्वान मुहम्मद अल गझाली (१९१७-१९९६) यांच्या मते, इतरांविषयीचे अज्ञान हे मुस्लिम समुदायाच्या समाजीय व सांस्कृतिक कोलमडीला जबाबदार असलेला सर्वांत जास्त महत्त्वाचा घटक आहे. मुस्लिमांना त्यांच्या वातावरणाचे स्पष्ट आकलन होण्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक अटींची पूर्तता करण्यासाठी त्यांनी उत्प्रेरक म्हणून प्रगतीला चालना देणाऱ्या बाह्य व आंतरीक अशा दोन्ही कृती सुचवल्या आहेत. ताहा जाबीर अलालवानी यांनी इस्लामी सुधारणेसाठी निष्क्रिय व असंतुलीत क्षेत्र शोधण्याचे लक्ष्य ठरवले.

इंटरनॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ इस्लामीक थॉट ही काही निवडक संस्थांपैकी एक आहे, जी प्रगतीसाठी प्रयत्नशील बहुविध मुस्लिम विद्वानांना आवाज देण्यासाठी आटोकाट प्रयत्न करत आहे. या विद्वानांच्या लेखनातील उद्देश मुस्लिम समुदायाला भेडसावणाऱ्या अडचणी शोधणे आहे. तसेच त्यांच्या इस्लामी वारसाचे पुनरुज्जीवन विधायक मार्गाने करणे आणि इतरांना शिकवणे, तसेच या ध्येयासाठी ते अवलंबवत असलेल्या पद्धतींचे विश्लेषण करून त्याचा विचार करण्याचा योग्य शाश्वत मार्ग सांगणे आहे.

**इज्तिहाद आणि नवीकरण**

सुधारणा चळवळींचा बहुतांश अभ्यास निव्वळ ऐतिहासिक दृष्टीकोनातून झालेला आहे. सुधारणा सुरू ठेवण्याच्या या प्रयत्नांचे महत्त्व मान्य करून आपल्याला खूप अधिक प्रमाणात सुधारणेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आधुनिक सलाफी सुधारणेला गती देणारे जमालुद्दीन अल अफगाणी, मुहम्मद अब्दुह व राशीद रिदा यांनी चळवळ पुढेत नेत तिच्यावर स्वतःचा शिक्का उमटवला.

अल अफगाणी यांनी क्रांतीचे स्वरूप म्हणून लोक चळवळीच्या कृतीकडे लक्ष्य केंद्रीत केले. मजबूत संवैधानिक राज्यासाठी कामात सहभागी होण्याची हाक दिली. संसदीय मंडळाच्या सुधारणा, सल्लामसलतीवर व निवडणूक प्रक्रियेवर आधारीत व्यवस्था निर्माण करण्यासाठी ती हाक होती. मुहम्मद अब्दुह यांच्या बाबतीत स्थिती उलट आहे. त्यांनी राजकीय व

सामाजिक बदलासाठी लोक चळवळीला खूप कमी महत्त्व दिले. अब्दुह यांनी लोकांवर कमी विश्वास दाखवला. त्यांची तुलना बुद्धिरहीत यंत्रांशी केली. परिणामी अब्दुह यांचे प्रयत्न दार उल उलूम सारख्या नव्या शैक्षणिक संस्था उभ्या करण्यावर केंद्रीत झाले. अल अजरासारख्या विद्यमान संस्थांसह धार्मिक दान मंत्रालय, इस्लामी धार्मिक न्यायालये आणि इतर संस्थांच्या सुधारणेवर भर दिला.

अब्दुह यांच्या सुधारणेचा उद्देश लोकांना त्यांच्या देशाच्या महत्त्वाची जाणीव करून देणे, आणि त्यांच्यात देशाभिमानाची भावना बळावणे, त्यांच्यात देश आपला असल्याची भावना निर्माण होण्यासाठी मदत करणे होता. तसेच समुदायाची प्रेरणा आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची सुधारणा यासाठी पोषण करणे होता. धर्माच्या बाबतीत अब्दुह यांनी लोकांना दैववादातून मुक्त आणि अवतरलेल्या संदेशाशी सुसंगत कार्य करण्याच्या उद्देशाने कारणमीमांसेच्या लाभाविषयी सजग करू पाहिले. अब्दुह हे पक्षपात, पंथवाद, आणि अंधानुकरण विरुद्ध लढ्यास बांधील होते. समाजीय विकास, संस्थांमधील सुधारणा, आणि लाभकारी लेखनाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी त्यांनी इज्तिहादची दारे खुली करण्याची हाक दिली.

अल अफगाणी आणि अब्दुह यांनी सुरू केलेल्या सलाफी चळवळीने मुस्लिम विचारवंतांना मुस्लिम समुदायाचे अंतर्गत प्रश्न व वसाहत वादातून निर्माण झालेली आव्हाने पेलण्यासाठी मोठे प्रोत्साहन दिले. सलाफी शाखेने आवश्यक काम काय केले, ते सांगायचे म्हणजे आधुनिक काळाच्या प्रकाशात इस्लामी मूल्यांचे आणि संकल्पनांचे फेर मूल्यांकन करण्याचे काम केले. हे करताना त्या मूल्यांना आणि संकल्पनांना नव–औचित्य दिले. पण, त्यांनी पश्चिमेचे किंवा आधुनिक संकल्पनांचे मूल्यांकन केले नाही. परिणामी गरज असलेले बदल ते करू शकले नाहीत.

**अपयशी प्रयोगांचे मूल्यांकन**

या प्रयोगांचा अभ्यास करून आपण त्यांच्या जमेच्या बाजू आणि त्यांच्या संकल्पनधारणा, केलेली कृती किंवा वापरपद्धतीच्या पातळीवरील उणीवांसाठी उपाय शोधू शकतो. चांगल्या किंवा वाईटासाठी बदल तेव्हाच होऊ शकतो जेव्हा तो लोकांकडून स्वीकारला जातो. म्हणजेच समुदायाच्या

पातळीवर, वैयक्तिक पातळीवर नव्हे. उदा. समुदाय शिक्षणाच्या माध्यमातून सकारात्मक बदल आणत असेल, तर त्यामुळे जीवनाच्या इतर क्षेत्रातही फलदायी बदल घडवू शकतात. सुधारणेच्या कृतीसाठी मजबूत संकल्पनेची चौकट तयार करण्यासाठी आपल्याला कुरआन आणि सुन्नाहवर आधारीत इस्लामी कायदा व तत्त्वज्ञाच्या विषयांची योग्य समज हवी. आजच्या काळातील आपल्या विषयांच्या योग्य सोडवणुकीसाठी त्यांचा आधुनिक अन्वयार्थ लावताना भौतिक व सामाजिक शास्त्रातील ताजे शोध, आधुनिक तंत्रज्ञानाची प्रगती यांच्या सोबत ताळमेळ बसवण्याची गरज आहे.

विचार व कृतीच्या बाबतीत समष्टिवादाचे व अभिजनवादाचे काही लाभकारी प्रभाव आहेत. मी समष्टिवाद इस्लामी शिकवणुकीचा साधन म्हणून वापर करत समाजातील विशिष्ट वर्ग किंवा समूहाचे हित व उद्देश दुसऱ्यांच्या बळावर साध्य करण्याच्या प्रवृत्तीला उद्देशून वापरत आहे. ज्याच्यासठी आपण अभिजनवाद शब्द वापरत आहोत, ही कल्पना तेव्हाच यशस्वी होऊ शकेल जेव्हा ती आत्मविश्वास देणारी व उत्साह वाढवणारी असेल, आणि कष्ट व त्याग करण्याची प्रामाणिक हव्यास व इच्छा असेल, हे लक्षात घेतले पाहिजे. बौद्धिक किंवा वैचारिक प्रवाहाला उत्साही सामुहिक पाठबळ तोपर्यंत मिळणार नाही, जोपर्यंत दोन अटी पूर्ण होत नाहीत, १) लोकांनी आजचे लक्ष्य व उद्देश समजून घेणे आवश्यक आहे; २) त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर त्यातून उपाय मिळू शकतो हे त्यांना आतून वाटले पाहिजे. कोणत्या ना कोणत्या मार्गाने संपूर्ण समुदाय या सुधारणेत सामील असले पाहिजे. बहुतांश इस्लामी कायदा सुधारणा हे करते. किंबहुना समाजाला विश्वासात घेतले जाते.

प्रकरण अकरावे

# समकालीन इस्लामी विचार : तुटलेल्या साखळीतील दुव्यांची दुरुस्ती

इस्लामी सुधारणेच्या अनेक चळवळींचे अपयश एक बाब इंगित करते की, दोष खूप खोलवर रूतून बसले आहेत. ते ओळखणे आणि व्यापक स्तरावर त्यांची दुरुस्ती करणे. तसेच नवशोध, सुधारणावादी अन्वयार्थाला चालना दिली पाहिजे, आणि संकल्पनांमधील दोषांची दुरुस्ती केली पाहिजे. त्यासाठी विद्यमान इस्लामी विचार साखळीतील तीन मोठ्या दुव्यांची तपासणी करणे गरजेचे आहे. हे तीन दुवे म्हणजे : विचार व कृतीसाठी श्रद्धेची चौकट; नियमन; आणि वास्तविक वापर.

**विचार व कृतीसाठी श्रद्धेची चौकटीची बांधणी**

अ-क-द हे त्रै मूळवर्ण त्यापासून आपल्याला श्रद्धेसाठी अरबी शब्द (आकीदाह) मिळतो, तो बांधणे किंवा गाठ मारणे ध्वनित करतो. जेव्हा आपण विशिष्ट सत्य वा आदर्शासोबत आपला इरादा किंवा हृदय बांधतो वा जोडतो, ते सत्य वा आदर्श आपल्यासाठी मार्गदर्शनाचे स्रोत बनते. बांधणे आणि ढिले होणे, बांधणे आणि खुले होणे हे सूत्र लक्षात घेतले तर इस्लामी धर्मात जेव्हा श्रद्धा कमकुवत होते आणि डागाने प्रदूषित होते, तेव्हा ती मुस्लिम समुदायाला एकत्र बांधण्याची क्षमता हरवणे सुरू करते. जसे एक दोरखंड गाठ सुटल्यास शिडाला बांधून ठेवू शकत नाही. जेव्हा मुस्लिम समुदायाची त्याच्या तत्त्वज्ञानाविषयक जाण विचलित होते, खंड पावते किंवा अपूर्ण असते, तेव्हा ही बाब त्यांच्या अभिसंस्कृतीत प्रकट होते.

इस्लामी धर्मसिद्धांताला लोकांचा प्रतिसाद वेगवेगळ्या पातळीवर असतो. एक आहे; समजून घेणे, दुसरी आहे त्यातील सत्यावर विश्वास. आणखी एक म्हणजे, विचार व कृतीसाठी मार्गदर्शनाचे अधिकारवाणी असलेले स्त्रोत म्हणून मान्य करत त्याच्या संशोधनावर आधीरत निष्कर्षावर पोचण्याचा निर्णय. जेव्हा राजकीय विचार हा सामाजिक न्यायाची मूल्ये आणि मानवी हक्काच्या अंगाने इस्लामी विचाराच्या

चौकटीपासून तुटतो, तेव्हा अनेक मुस्लिम अन्याय्य मार्गाला कायदेशीर करण्याचा विचार करतात. त्यातून न्याय्य जुलमी, आणि अनिश्चित गोंधळापेक्षा निर्दयी जुलमी बरा अशी वाक्ये पुढे होतात.

अल नज्जर यांनी इस्लामी धर्मसिद्धांत आणि कायदा यांच्यात मजबूत संबंध प्रस्थापित करण्याकामी आधुनिक मुस्लिम विद्वान उचलू शकतील अशी दोन एकमेकांशी संबंधित पावले सुचवली आहेत. पहिले, इस्लामी कायद्याला केंद्रीत प्रत्येक विषयांच्या सैद्धांतिक अभ्यासाला वाहून घेणे. दुसरे म्हणजे, दिला जाणारा प्रत्येक कायदा पायंडा हा मजबूत धर्मसिद्धांताच्या आधारे दिला गेला पाहिजे, याची खात्री करणे. म्हणजेच, त्यात इस्लामी कायद्याची विशिष्ट गरज आणि या गरजेची पुर्तता करणारी सर्वव्यापी तत्त्वे या दोहोंचा समावेश असला पाहिजे.

**मध्यममार्गी कल**

अरबी मूळत्रैवर्ण व-स-त हे कशाच्या तरी मध्यभागी येण्याशी संबंधित आहेत. म्हणजेच, दोन टोकांच्या मधे, मध्यभागी. याप्रमाणे ते निःपक्ष व न्याय याच्याशी संबंधित आहेत. ईश्वराने मुस्लिम समाजाला मध्यममार्गी समाज म्हणून संबोधले आहे. (सुरह अल बकराह, २:१४३) मध्यममार्ग किंवा सामंजस्य आणि वैश्विक मार्गदर्शक तत्त्वे सांगणारे सर्व कायदा-पायंडे हे सर्वसमावेशक इस्लामचे वैशिष्ट्य आहे. मध्यमार्ग विचार व वर्तन, संकल्पना आणि कृती या दोन्हींचे नियमन करतो. इस्लामच्या या वैशिष्ट्याने भ्रष्ट होण्यापूर्वी थोर अभिसंस्कृतीला जन्म दिला. हे भ्रष्ट होणे कुरआनाच्या मध्यम मार्गापासून दूर जाण्याने किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याने झाले आहे. समंजस तत्त्वाचा अर्थ आत्मा व शरीर यांच्यात सौहार्द असणे आणि धार्मिक मूल्ये व सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाच्या गरजा यांच्यात कुठेही विरोधाभास किंवा संघर्ष नसणे अशा पद्धतीचे जीवन जगण्याची शिकवण मुस्लिमांना दिली आहे.

सुरुवातीच्या मुस्लिमांचा दृष्टीकोन स्वीकारण्यासाठी त्याकडे परतणे म्हणजे नेमके काय असणार आहे? यात त्यांची इस्लामी तत्त्वज्ञानाची जाण, त्यातील त्यांचा साधेपणा, स्पष्ट व शुद्धता पुन्हा कवटाळणे; त्यांची सहृदयी आध्यात्मिक उपासना कवटाळणे; इस्लामी मूल्यांचे मजबूत जोडलेले जाळे

नीतिमत्ता म्हणून स्वीकारणे; व्यापक स्तरावर लवचीक घटक म्हणून इस्लामी कायद्याचा स्वीकार करणे; त्यांच्या सारखे जीवनाचे सातत्यपूर्ण नियमन करणारे वैश्विक कायदे आणि ईश्वराला जबाबदार उच्च नीतिमान व कारणमीमांसा लाभलेला माणूस म्हणून पुन्हा स्वीकारणे. परंपरा व आधुनिकता याची चर्चा करताना अल करदावी यांनी गतकाळाचे निर्बुद्ध निश्चितीकरण, आणि भावी काळाची अति ओढ याबाबतीत सावध केले आहे. त्यांनी निरीक्षण नोंदवले आहे की, इस्लाम मध्यममार्गी स्थान घेतो, तो दोन्ही टोकांना बळी पडत नाही.

**वास्तववाद आणि दमदार वापराचे न्यायशास्त्र**

ग्रंथाचा वास्तव जीवनात वेगवेगळ्या स्थळी, काळी  व परिस्थिती नुसार कसा वापर केला पाहिजे, हे समजणे गरजेचे आहे. वास्तव जीवनात वापरसाठी धार्मिक ग्रंथाचे अन्वयार्थानुसार टीकाग्रंथाची साधने तयार झाली. उदा. मानवी गरजेनुसार (मसालीह मुरसलाह) विकसित होणारे न्यायिक अधिसंदर्भ (इस्तिहसान)आणि इस्लामी कायद्याचा सर्वसमावेशक उद्देश याला प्राधान्य असले पाहिजे. त्या तुलनेत एखाद्या विषयात जिथे आधिकारीक इस्लामी धर्मग्रंथ स्पष्ट नाहीत किंवा सहमती नाही, तिथे अनिर्बंध गरजेवर आधारीत (इस्तिसलाह) कियास (अदमास) किंवा विश्लेषणात्मक कारणमीमांसेचे निष्कर्ष विशिष्ट मानवी गरज पूर्ण करण्यासाठी वैध पायंडा दिला जातो. याला प्राधान्य असता कामा नये. दुर्दैवाने ही चांगली साधने मुस्लिम न्यायविदांमध्ये वादाचा विषय झाली आहेत. या साधनांना मान्यता देणाऱ्या न्यायविद्वानांनी ही साधने न्यायशास्त्राच्या वापरासाठी व्यवस्थित विकसित केली नाहीत.

अल नज्जर यांच्या 'समजून घेण्याच्या पद्धतीत' तीन घटकांचा समावेश होतो. १) सम्वेषण (धुंडाळणे), २) सार काढणे ३) एकात्मीकरण. अल नज्जर यांनी सांगितलेल्या ग्रंथ समजून घेण्याच्या प्रक्रियेचा इस्लामी कायदे पायंडे एकात्म भावाने म्हणजेच एकमेकांच्या संदर्भाने समजून घेणे. ग्रंथ समजून घेण्यासाठी अल नज्जर यांनी पुढील आधार निश्चित केले आहेत, १) भाषाशास्त्र, २) हेतू (ग्रंथाचा उद्देश पूर्ण होतो का?), ३) पुरक, (इतर ग्रंथ कसे पुरक ठरतात), ४) तर्कसंगत.

अल नज्जर सांगतात की,ज्या उद्देशासाठी केले, तो पूर्ण करण्यासाठी कायदा पायंडे वापरताना अनुरूप पद्धतिशास्त्र अंगिकारणे गरजेचे असते. त्यांच्या दृष्टीने पद्धतिशास्त्रासाठी खूप महत्त्वाचे तत्त्व म्हणजे विशिष्टता किंवा व्यक्तिगतकरण. बहुविध परिस्थिती, प्रकरण आणि घटना यांनी वास्तव बनलेले असते. यातील घटना विविध भौगोलिक व ऐहिक संदर्भाने होतात आणि त्या व्यक्ती व समाजाला प्रभावित करतात. हे वास्तव असते. परिणामी विशिष्ट कायदा-पायंड्याचा प्रत्येक परिस्थितीत तिच्यातील फरक लक्षात न घेता वापर केल्यास स्थिती कठीण बनते आणि उद्देश पूर्तीऐवजी उद्देश हानी होते.

वास्तव जीवनातील परिस्थितीत इस्लामी कायदा-पायंडे वापरण्याचा अनुरूप दृष्टीकोन हा वास्तववाद, नियमन, व धर्माच्या मजबूत चौकटीनुसार विचार व कृतीसाठी हाक देतो. हे सर्वच घटक महत्त्वपूर्ण आहेत, कारण त्यांच्यापैकी कोणताही एक घटक इस्लामी कायद्या पायंडाचा वापर निश्चित करू शकत नाही. ते सर्व घटक आले आणि एकत्र काम करू लागले की आपण समकालीन इस्लामी विचारसाखळीचे दुवे पुन्हा जोडू लागू.

## लेखकाविषयी

सईद शब्बर यांनी मोरोक्को येथील बेनी मेल्लालच्या काझी अय्याद विद्यापीठात कला व मानव्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून सेवा बजावली आहे. तसेच इस्लामिक थॉट आणि इंटरिलीजियस आणि इंटरकल्चरल डायलॉगच्या तिसऱ्या परिषदेसाठी विकास आणि संशोधन प्रमुख म्हणूनही काम केले. ज्ञान व अभिसंस्कृती अभ्यास केंद्र आणि टर्मिनोलॉजी रिसर्च ग्रुपचे प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच मोरोक्को आणि इतर अनेक अरब विद्यापीठांमध्ये मानद प्राध्यापक म्हणून शिकवले आहे. असंख्य शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था यांचे सदस्य म्हणून काम केले. त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सेमिनार आणि परिषदांमध्ये योगदान दिले आहे.तसेच मोरोक्को आणि आंतरराष्ट्रीय शैक्षणिक जर्नल्स आणि नियतकालिकांमध्ये त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत.

संक्षिप्त ग्रंथ मालिकेच्या स्वरुपात IIIT ग्रंथ मालिका :

संक्षिप्त स्वरूपातील IIIT ग्रंथ मालिका संस्थेद्वारे सोप्या भोषत प्रस्तुत एक मूल्यवान संकलन आहे. मूळ उद्देश हा आहे की, वाचकांना मूळ ग्रंथाचा परिचय प्राप्त व्हावा व ते वाचण्याची प्रेरणा प्राप्त व्हावी.

मुस्लिम जगतात सकारात्मक पुनरुज्जीवन किंवा सुधारणा घडवून आणण्यात इज्तिहाद मूलभूत भूमिका पार पाडू शकतो. हे पुनरुज्जीवन व्यापक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक सुधारणा व विकास यांच्या आधारे करता येऊ शकते. इस्लामच्या सुरुवातीच्या शतकात अनेक विषय, गतीने विस्तारणाऱ्या समाजापुढील आव्हाने आणि प्रश्न सोडवण्यास मुस्लिमांनी दिलेल्या प्रतिसादात कुरआन व हदीसचा आधार घेत अन्वयार्थ लावत विद्वानांनी त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा आणि बुद्धिमत्तेचा वापर केला. ही परंपरा इज्तिहाद म्हणून ओळखली जाते. नंतरची शतके या विद्वानांच्या विद्यमान निवाड्यांचेच पालन करत सामान्यतः इज्तिहादची दारे बंद असलेल्या अवस्थेत गेली. कारणमीमांसा व प्रतिभा हे विचारशाखांचे बंदी झाले. पूर्वीच्या विद्वनांची मते गतिरुद्ध झाली. परिणामी मुस्लिम जगतही गतिरुद्ध झाले आहे. मागच्या काळातील उपाययोजना आजच्या आपल्या काळातील जटिल व विशिष्ट वास्तवाला लागू करण्याच्या प्रयत्नात मुस्लिम विचाराच्या चैतन्यास पक्षाझात आला आहे. त्याच्या दिशेबाबत भ्रम निर्माण झाला आहे. अनेक शतकांच्या ऱ्हासानंतर मुस्लिम समाजाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आपल्याला इज्तिहादची प्रथा पुनर्जीवित करण्याची गरज आहे.

बौद्धिक नूतनीकरण म्हणजे विद्यमान विचारापासून दूर जाणे किंवा नवी विचारसरणी जन्माला घालणे नाही. या उलट विद्यमान संकल्पनांचा पुनर्शोध आणि त्यांचा आपल्या काळाशी सुसंगत विकास करणे आहे. अर्थात हा विकास अनुरूप नियम, रीत वापरत व मान्यताप्राप्त स्थिर मानक लक्षात घेत करणे अपेक्षित आहे. अधिकारवाणी असलेले संदर्भ बिंदू म्हणजे, कुरआन, सुन्नाह, इस्लामी तत्त्वे समजून घेण्यासाठी लागणारी साधने (कारणीमांसा, सहमती आदी) आणि इस्लामी बौद्धिक व न्यायिक वारसा.

₹ 50/-

GENUINE PUBLICATIONS & MEDIA PVT. LTD.
B - 35 (LGF), Nizamuddin West, New Delhi - 110 013
Tel.: +91-11-41827475, 24352732, 24352048
info@genuinepublications.com | www.genuinepublications.com

978- 93- 91659- 23- 3